मंगळवार, २९ नोव्हेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१०७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 22 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-107 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

## सहावी ते बारावीपर्यंतच्या मुलींना शाळेत मोफत सॅनिटरी पॅड द्या !

### याचिकेनंतर सुप्रीम कोर्टाची केंद्रासह राज्यांना नोटीस



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : शाळेतील इयत्ता 6 ते 12 पर्यंतच्या मुलींना मोफत सॅनिटरी पॅड पुरवण्याच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने केंद्र आणि राज्यांना नोटीस बजावली आहे. सरकारी, सरकारी अनुदानित आणि निवासी शाळांमध्ये मुलींना सॅनिटरी पॅड पुरवण्याबरोबरच स्वतंत्र स्वच्छतागृहांचीही तरतूद असावी, असे याचिकेत म्हटले आहे.**



देशभरातील सरकारी शाळांमध्ये इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत शिकणाऱ्या मुलींना मोफत सॅनिटरी पॅड देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आज केंद्र, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे उत्तर मागितले आहे. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा यांच्या खंडपीठाने सामाजिक कार्यकर्त्या जया ठाकूर यांच्या याचिकेची दखल घेत केंद्र सरकार आणि सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटिसा बजावल्या आहेत. मध्य प्रदेशातील रहिवासी असलेल्या जया ठाकूर या व्यवसायाने डॉक्टर आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांची मदत मागितली आहे. तसंच म्हटले आहे की याचिकाकर्त्याने सरकारी आणि सरकारी अनुदानित शाळांमधील मुलींच्या स्वच्छतेचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. सामाजिक कार्यकर्त्या जया ठाकूर यांनी वरिंदर कुमार शर्मा आणि वरुण ठाकूर यांच्या माध्यमातू दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, 11 ते 18 वयोगटातील गरीब घरच्या मुलींना पीरियड्सदरम्यान स्वच्छता राखण्यासाठी समस्यांचा सामना करावा लागतो. अनेक मुली मासिक पाळी या विषयासंदर्भात जागरुक देखील नाहीत. त्यांचे पालक देखील शिक्षित नाहीत. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने आणि अनिष्ट प्रथा परंपरांमुळे या मुलींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात, शिवाय यामुळे या मुली शाळेत देखील येत नाहीत. याचिकेत मागणी केली आहे की, यासाठी जागरुकता करणे अत्यंत महत्वाचे आहे. वंचित घटकातील महिला आणि युवतींसाठी स्वच्छचा सुविधा आणि सॅनिटरी पॅड्ससारख्या सुविधा मोफत देण्यात यावे.

## महत्वाची बातमी

### आफ्रिकेतील आंबा थेट कोल्हापूरच्या मार्केट यार्डात

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** अंब्याच्या हंगामाला अजून प्रारंभ झाला नसला तरी, कोल्हापूरमधील शाहू मार्केट यार्डात फळ बाजारात दक्षिण भारतामधील तसेच परदेशी आंब्याचे आगमन झाले आहे. 50 पेट्या आंबा याठिकाणी पोहोचला आहे. आलेल्या अंब्यांचे सौदे दोन दिवसांमध्ये होणार असल्याची माहिती आहे. यंदा तीन महिने अगोदरच दक्षिणेकडील केरळच्या आंब्याचे आगमन झाले आहे. या सोबतच आफ्रिकन देशातील मलावी आंबा कोल्हापूरच्या बाजारपेठेत पहिल्यांदाच आला आहे. शाहू मार्केट यार्ड डीएम बागवान यांच्या 15 नंबर गाळ्यामध्ये हे आंबे उपलब्ध आहेत. कोल्हापूरच्या बाजारपेठेत दिवाळी संपल्यानंतर आंबा दाखल होतो. कोकणी हापूस आगमन हे मुहूर्तासाठी लवकर होत असते. मात्र, अद्याप कोकणी हापूस आंबा बाजारपेठेत आलेला नाही. दरवर्षी आंबा हंगामामध्ये हापूस आंबा व दक्षिणेकडील आंबा यांची जोरदार उलाढाल होते. दक्षिणेकडील आंबा कोकण हापूसच्या तुलनेत स्वस्त असल्याने मागणी असते. आफ्रिकन आंब्याची चव कोकणातील हापूस आंब्याप्रमाणेच मलवी देशातील हापूस आंब्याला भारतातही मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. दरवर्षी हा आंबा देशाच्या बाजारपेठेत दाखल होतो. यावर्षी देखील मलावीमधून हापूस आंबा मुंबईच्या एपीएमसी बाजार समितीत दाखल झाला आहे. महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये या मलावी आंब्याला मोठी मागणी आहे.

## धावत्या गाडीत आवळला पोलिसाचा गळा

### गुंडाचा फिल्मी थरार; जीप पलटी होऊन 5 पोलिस जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** खुनातील आरोपी असलेल्या रोहिदास निर्मळ याला नेकनूर पोलिस ठाण्याकडे येत असताना आरोपीने चालकाचा गळा दाबून पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिस गाडीचा अपघात होऊन पोलिस अधिकारी मुस्तफा शेख यांच्यासह अन्य पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. सध्या जखमी पोलिसांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुळुकवाडी येथील रोहिदास विठ्ठल निर्मळ याने दोन दिवसापूर्वीच आपल्या चुलता, चुलती आणि इतर दोघा जणांवर कोयत्याने वार करून हल्ला केला होता. यामध्ये त्याचे चुलते बळीराम निर्मळ यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्याच खुनाच्या आरोपात रोहिदास याला नेकनूर पोलिसांनी अटक केली होती. आटक करून रोहिदासला न्यायालयासमोर हजर केले असता त्याला पोलिस कोठडी सूनवण्यात आली होती. त्यानंतर पोलिस त्याला घटनास्थळावर घेऊन जात असताना त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने चालू गाडीतच चालक पोलिस कर्मचाऱ्याचा गळा आवळला. त्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटून अपघात झालाय. गाडी रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. त्यामुळे गाडीतील पोलिस कर्मचारी गंभीर जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमी झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आणि आरोपील देखील तातडीने रूग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामध्ये नेकनूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शेख मुस्तफा, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत देशमुख, पोलिस अमलदार सचिन मुरूमकर, बाबासाहेब खाडे आणि या प्रकरणात पंच म्हणून गेलेले ग्रामपंचायतचे कर्मचारी सय्यद फारेज व संदीप काळे हे जखमी झाले आहेत. या सर्व जखमींवर बीडच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात जखमी झालेला आरोपी निर्मळ याला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, खूनातील आरोपीकडूनच पोलिसाचा गळा दाबल्याचा प्रयत्न करण्यात आल्यामुळे बीडमध्ये एकच खळबळ उडाली आहे. घटलेल्या घटनेचा पंचनामा करण्यात आला असून या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधिक कसून तपास करत आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.



## कोर्टात बोलावून हल्ला, अटकेचा डाव

### संजय राऊतांचा गंभीर आरोप

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** बेळगावमध्ये ३० मार्च २०१८ रोजी केलेल्या प्रक्षोभक भाषणाप्रकरणी शिवसेना खासदार संजय राउत यांना समन्स पाठवण्यात आले आहे. बेळगाव न्यायालयाने त्यांना हे समन्स पाठवले आहे. यामध्ये संजय राउत यांना १ डिसेंबरला न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या मुद्द्यावरुन आता महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक हा वाद तापण्याची शक्यता आहे. बेळगाव न्यायालयाने पाठवलेल्या समन्सनंतर संजय राउत यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी संजय राउत यांनी आपली बाजू मांडताना म्हटले की, शिवसेना ही सीमाबांधवांच्या पाठिशी ठामपणे उभी आहे. सीमाबांधवांवर हल्ले झाले किंवा कायद्याचा बडगा दाखवून त्यांना तुरुंगात डांबले गेले, तर महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटल्यावाचून राहणार नाहीत, असे मी म्हटले होते. यामध्ये प्रक्षोभक काय होते, हे आम्हाला कळत नाही. पण २०१८ मध्ये केलेल्या माझ्या भाषणाची दखल घेऊन बेळगाव न्यायालयाने मला १ डिसेंबरला हजर राहण्यास सांगितले आहे. मी त्याठिकाणी गेल्यानंतर कोर्टात माझ्यावर तेथील संघटनांकडून हल्ला होऊ शकतो. तसेच मला बेळगावमधील तुरुंगात डांबून ठेवले जाऊ शकते, अशी माहिती मला गेल्या दोन दिवसांमध्ये मिळाली आहे. या सर्व कारस्थानाची माहिती माझ्याकडे आहे. पण मला अटकेची भीती नाही.


कर्नाटक किंवा कोणतंही सरकार असो मला महाराष्ट्रासाठी अटक होणार असेल तर मी बेळगावात जाईन. मी बेळगावात लपुनछपून जाणार नाही. मी कोल्हापूरच्या रस्त्याने हजारो शिवसैनिकांसोबत जाऊन बेळगाव न्यायालयात हजर होईन. मला त्यांना किती दिवस ठेवायचे आहे, ते ठेऊ दे. पण हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आवाज उठवणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे. शिंदे-फडणवीस सरकारने समितीने नेमलेल्या चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई यांच्या समितीने या सगळ्याची दखल घेतली पाहिजे, अशी अपेक्षा संजय राउत यांनी व्यक्त केली. गेल्या काही दिवसांपासून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई महाराष्ट्रातील गावं कर्नाटकात समाविष्ट करण्याविषयी बोलत आहेत. त्यांनी एका विषयाला तोंड फोडले आहे. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठामपणे बोलताना दिसत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी लढणाऱ्या आमच्यासारख्या लोकांना कायदेशीर बाबतीत अडकवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोपही संजय राउत यांनी केला.

## केंद्र सरकार व न्यायव्यवस्था आमने-सामने



आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : केंद्रीय विधी आणि न्याय मंत्री किरण रिजिजू यांनी कॉलेजियम पद्धतीवर केलेल्या टीकेवर सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती एस. के. कौल यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रिजिजू यांनी अशी टीप्पणी करायला नको होती, असे कौल यांनी म्हटले आहे. वातम्यांकडे दुर्लक्ष करण्यात आम्हाला काहीच अडचण नाही. पण ते म्हणत आहेत की, आम्हीच सर्व करतो. एखाद्या वरिष्ठ पदावरील व्यक्तिकडून निर्णय घेण्याचत काही आक्षेप नसावा. असे व्हायला नको होते इतकेच आम्ही सांगू शकतो, असे कौल यांनी म्हटले आहे. दरम्यान, न्यायमूर्तींनी माध्यमांच्या वृत्तावर जाऊ नये, अशी विनंती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केली आहे. यावर कौल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुलाखतीमध्ये बोलल्या गेलेल्या गोष्टी फेटाळणे कठिण असते. मी यावर भाष्य करत नाही. अॅटर्नी जनरल आणि सॉलिसिटर जनरल या दोघांनीही विधी अधिकाऱ्याची भूमिका पार पाडावी, अशी माझी अपेक्षा आहे. न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याचे पालन केले जाईल, याची खात्री करण्यासाठी सरकारला त्यांनी सल्ला द्यावा, असे आवाहन कौल यांनी केले आहे. सरकारकडे फाईल प्रलंबित आहे, असे म्हणू नका. सरकारकडे फाईल पाठवूच नका. तुम्ही स्वतःचे स्वतःची नेमणूक करा, अशी खोचक टीका रिजिजू यांनी केली होती. भारतीय संविधान आणि जनतेने न्यायाधीशांना अधिकार दिले आहेत. जर केवळ न्यायाधीशांनीच निर्णय घ्यायचे असतील, तर मग लोकांचा या निर्णयाला पाठिंबा असेल अशी अपेक्षा कशी काय ठेवली जाऊ शकते, असेही रिजिजू यांनी 'टाईम्स नाऊ' या वृत्त संस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. कॉलेजियम पद्धतीमध्ये त्रृटी आहेत. ही व्यवस्था पारदर्शक नसल्याचा आवाज लोक उठवत आहेत. त्यामुळे अपेक्षित पाऊले सरकार उचलत आहे. जर एखाद्या न्यायाधीशाने लोकांच्या भावनांशी संबंधित प्रकरणावर भाष्य केले, तेव्हा न्यायाधीशांनी किंवा न्यायालयाच्या निकालाने लक्षण रेखा ओलांडली का? याबाबत आम्हाला विचार करावा लागेल, असे रिजिजू यांनी म्हटले होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी

' होम मिनिस्टर ' नावाचं एक धारावाहिक आहे. टीव्ही वर सुरु असणाऱ्या या शोचा आनंद भगिनी वर्ग मोठया प्रमाणात घेताना आढळून येतो. ' भाऊजी ' या नावाने लोकप्रिय असणारे आदेश बांदेकर या शोचे अतिशय कुशल आणि सहज संचालन करतात. अर्थात मला तुमच्याशी या शोबद्दल बोलायचं नाही. पण या शोमध्ये आदेश बांदेकर एक प्रश्न हमखास विचारतात. तो माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे. ते म्हणतात, ' वहिनी, आभार मानायचे तर कोणाचे मानाल किंवा धन्यवाद द्यायचे तर कोणाला द्याल ?' मग ती भगिनी आपल्या माहेरचे, सासरचे किंवा आणखी कुणा व्यक्तीचे आभार मानते किंवा धन्यवाद देते. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर ती त्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. याचं तात्पर्य असं की आपल्या जीवनात घडलेल्या चांगल्या गोष्टींबद्दल, यशाबद्दल कोणाची तरी मदत आपल्याला झालेली असते. आपण मिळवलेलं यश किंवा केलेली प्रगती ही एकट्याची




असू शकत नाही. आपण एकटे त्याचे श्रेय घेऊ शकत नाही. म्हणून आजच्या परिस्थितीत या यशाच्या पायरीपर्यंत पोहोचताना आपल्याला अनेक लोकांची मदत झालेली असते. त्या सगळ्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांचे आभार मानणं वा त्यांना धन्यवाद देणं हे आपलं आद्य कर्तव्य. आपण तसं केलं नाही तर आपण कृतघ्न ठरू. आचार्य अत्रे यांनी एके ठिकाणी लिहून ठेवलं आहे की, ' उद्या माझी समाधी बांधायची झाली तर तिच्यावर एक वाक्य लिहून ठेवा. ते असं की हा माणूस मूर्ख असेल, अविचारी असेल पण कृतघ्न कधीच नव्हता. कृतज्ञ असण्याबद्दलचा महिमा इतक्या सुंदर शब्दात क्वचितच कोणी सांगितला असावा. अनेक साधू, संत, निरनिराळे उपासना संप्रदाय आपल्यला जे काही मिळाले आहे त्याबद्दल कृतज्ञ राहण्यास सांगतात. तुकाराम महाराजांच्या काळात मोठा दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळात त्यांचे जवळचे आप्त हे जग सोडून गेले. त्यांच्या सावकारी धंद्याचे तीन तेरा वाजले. पण ते परमेश्वराला म्हणतात ' बरे झाले देवा निघाले दिवाळे, बरी या दुष्काळे पीडा केली. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# अंतर्मनातील विचारांमुळे जीवन उज्ज्वल व्हावे


आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा संबंध आपल्या अंतर्मनावर कोरल्या गेलेल्या विचारांशी असतो. एखाद्या व्यक्तीचे यश देखील आपल्या मनांत नकारात्मक विचार निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकते. अलीकडच्या काळांत अल्पवयीन मुले-मुली नैराश्याचे शिकार होताना दिसत



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आहेत. नकारात्मक विचारांचं पर्यवसान रागात, उद्वेगात आणि कालांतरानं गुन्हेगारीत होण्याचं प्रमाण अलीकडच्या काळांत खूपच वाढल्याचं दिसून येत आहे. ही अतिशय खेदाची आणि चिंतेची बाब आहे. आपल्या व्यक्त होण्यातून सकारात्मक वातावरणाची निर्मिती करणं जरुरीचं असतं. सकारात्मक विचारमंथन हे नेहमीच उर्जा देणारे ठरत असते. त्याचा थेट परिणाम आपल्या व्यक्तिमत्वावर होत असल्याची अनुभूती येत असते. त्यासाठी आपलं व्यक्तिमत्व "अ" व्यक्त राहू नये. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळे आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं; पण वळत नसतं, हीच तर उणिव असते. आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.




आधुनिक केसरी

## परमार्थी स्वानंद | हरिपाठी ||

यत्न हाच देव | मानी चिंतनात ||
असावे कर्मात | अधिष्ठान ||१||
कर्मावीन नाही | इच्छेस पूर्तता ||
अंगी सतर्कता | असू द्यावी ||२||
अहंकार जाळी | पुण्याच्या राशीला ||
कर्माच्या गतीला | खीळ घाली ||३||
सात्विक भावाने | स्फुल्लींग जागावा ||
संसार तोलावा | संयमाने ||४||
कर्मावीन कैसा | संसारी आनंद ||
परमार्थी स्वानंद | हरिपाठी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### विनवणी

दास मी तुझ्या पायीचा। नको आसरा कोणाचा।
सर्व सुखे तुझे ठायी। नको पसारा मोहाचा।।
नित्य राही तू अंतरी। तुझा शब्द गं धीराचा।
ऐसी स्मरावी गं गीते। शब्द माये अधीराचा।।
गातो गीत नित्य तुझे। नाही भाग इंद्रियाचा।
चंद्रहास म्हणे माझा। शब्द आहे अंतरीचा।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# साधन निष्कामबुद्धीने आणि सावधानपणे करावे



आधुनिक केसरी

भगवंतापासून जो निराळा राहात नाही तो मुक्तच. 'मी भगवंताचा' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. 'मी' नसून 'तो' आहे हे जाणणे म्हणजे मुक्तता प्राप्त करून घेणे. देहात असून देहातीत राहतो तो मुक्त. 'राम कर्ता' हे जाणतो तो मुक्त. 'माझे माझे' म्हणून आपण बद्धावस्था लावून घेतो, बद्धाचे आवरण काढून टाकले की आपण मुक्तच आहोत. माझ्या मनावर कशाचाही परिणाम झाला नाही आणि समाधान कायम राहिले, की मुक्तावस्था. 'माझ्यासारखा पापी मीच' असे आपण मनानेच ठरवतो आणि दुःख करीत बसतो. मी एक भगवंताचा झालो, आता नाही कोणाचा, असे म्हणावे, आणि जगात नटासारखे वागावे. वास्तविक, आपण मायेकडून पछाडले गेलो आहोत. भगवंताजवळ माया ही छायेप्रमाणे आहे. आपण मायेचा नियंता जो भगवंत, त्याचे होऊन राहावे; मग माया खरी नाही हे समजते. मायेला ओळखणे म्हणजे विवेक, आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानणे, हे वैराग्य.

पापपुण्य हे मनाचे धर्म आहेत, मी आता नाम घेतो, माझी सर्व पापे त्यामुळे नाहीशी झाली आहेत अशी दृढ भावना झाली की तो निष्पाप झाला हे समजावे. चारचौघे करतात म्हणून साधन करून नाही चालणार. साधनात दृढ भाव पाहिजे. साधन करायचे ते योग्य मार्गाने झाले पाहिजे. ते अगदी निष्काम असावे. बुद्धिभेद करणारे लोक जगात नेहमी असणारच; पण साधकाने आपला बुद्धिभेद होत नाही इकडे जागृत असावे. काही पुरुष किंवा स्त्रिया यांना आपला स्वतःचा असा काही प्रपंच राहिलेला नसतो, तरीही हे लोक उगीचच जगाचे दोष काढीत बसतात; दुसऱ्यांच्या घरी जाऊन उठाठेव करतात; हे फार मोठे पाप आहे. साधकाने ते कटाक्षाने टाळावे. ज्या लोकांना आपल्यामध्ये दोष आहेत हे कळतच नाही, ते लोक अगदी खालचे समजावेत; ज्यांना आपला दोष कळतो ते दुसऱ्या प्रतीचे समजावेत; आपण प्रयत्न करूनसुद्धा भगवंताच्या आड येणारा दोष जात नाही म्हणून तळमळ असणारे लोक हे सर्वांत चांगले; साधकाने तसे बनले पाहिजे. परमार्थमार्गामध्ये अर्ध्यापर्यंत गेल्यावर, मग पुढे जाणारे साधक फार थोडे असतात. खरे म्हटले म्हणजे साधन आणि वाचन असले की साधक कधी मागे पडायचा नाही. ब्रह्मचारी साधकाने प्रपंचातल्या उठाठेवी करू नयेत, कारण तशाने प्रपंचाचे प्रेम त्याला लागेल. त्याने प्रपंचापासून चार पावले दूर रहावे, नाही तर तोच हवा असे वाटू लागते. जगात किती पोथ्या आणि किती मते आहेत ! एवढे पाहायला वेळ कुठे आहे ? म्हणून साधकाने गीता, ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत, किंवा दासबोध, असा एक ग्रंथ प्रमाण मानून त्याप्रमाणे साधन करावे.

मुंगी डोंगरावर चढण्याचा प्रयत्न करते आणि कालांतराने का होईना पण वर पोहोचल्याशिवाय राहात नाही, हे ध्यानात घेऊन आपण प्रयत्नाला लागू या.

# अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

ती खरीच असतात, ती खोटी असू शकत नाहीत, याचे कारण असे सांगण्यात येते की ती ईश्वराची निःश्वसिते, ईश्वराचे शब्द आहेत, आणि म्हणून ती आपण श्रद्धेने स्वीकारली पाहिजेत. हीच कल्पना आविष्कृत धर्माचे मूलग्रंथ, अवतारांचे आणि प्रेषितांचे शब्द यांच्याविषयीही आहे. आध्यात्मिक ज्ञानाचा दुसरा उपाय साक्षात्कार. हा अनुभवाचा एक अलौकिक प्रकार समजला जातो. या अनुभवात एखादी अलौकिक गोष्ट उघड होते, तिचे साक्षात् दर्शन घडते. हातच्या काकणाला आरसा कशाला असे आपण विचारतो तेव्हा आपल्याला असे अभिप्रेत असते की जी गोष्ट आपल्या डोळ्यांसमोर ढळढळीतपणे उपस्थित आहे तिच्याविषयी संशयाला जागा नसते. तीच गोष्ट आध्यात्मिक साक्षात्कारासंबंधी खरी आहे असा दावा केला जातो. फरक एवढाच आहे की स्थूल डोळ्यांनी दर्शन घडणे हा लौकिक साक्षात्कार आहे, तर ज्याला अध्यात्म्यात साक्षात्कार म्हणतात तो अतींद्रिय ज्ञान करून देणारा असल्यामुळे अलौकिक आहे असे समजतात. तो इंद्रियातीत, अनुमानातीत असतो. आध्यात्मिक गोष्टीचे ज्ञान या प्रकारचे असते. उदा. भक्ताला परमेश्वराचे दर्शन घडते तेव्हा तो साक्षात्कारच असतो, किंवा साधकाला जेव्हा 'अहं ब्रह्मास्मि असा अनुभव येतो तेव्हा तोही साक्षात्कारच असतो.



युक्तिवादाने किंवा शब्दाने 'अहं ब्रह्मास्मि' हे बौद्धिक ज्ञान होणे आणि त्याचा साक्षात्कार होणे यांत भेद आहे. आपण ब्रह्म आहोत हे खरे असले पाहिजे असे युक्तिवादाने, तर्काने पटणे वेगळे, आणि तशी अनुभूती येणे वेगळे. या दोन उपायांखेरीज आणखी एक उपाय अध्यात्मात वापरला जातो. तो म्हणजे तार्किक युक्तिवादाचा. हा उपाय भारतीय अध्यात्मात आणि पाश्चात्य अध्यात्मात भिन्न प्रकारांनी, भिन्न हेतूंनी वापरला जातो. भारतीयांचा भर मुख्यतः शब्द आणि साक्षात्कार यांवर असतो हे वर सांगितले. पण भारतीय तत्त्वज्ञानात युक्तिवादही मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतो. मात्र त्याचे प्रयोजन पाश्चात्य तत्त्वज्ञानातील त्याच्या प्रयोजनाहून भिन्न असते. भारतीय तत्त्वज्ञानात तर्काचा, युक्तिवादाचा वापर शब्दाप्रमाणे स्वीकारलेल्या सिद्धांतात काही अंतर्विरोध नाहीत हे दाखवून आपल्या अध्यात्मावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना उत्तरे देण्याकरिता, आणि अन्य अध्यात्मांच्या (कारण अध्यात्मव्यवस्था अनेक आहेत) खंडनार्थ केला जातो. परंतु पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची गोष्ट वेगळी आहे. भारतीय अध्यात्माची मूलप्रेरणा मुमुक्षा असून त्याचा मूलाधार श्रुती (शब्द) आहेत हे आपण पाहिले. तीच गोष्ट पाश्चात्त्यांच्या ख्रिस्ती धर्माधिष्ठित तत्त्वज्ञानाची (THEOLOGY) आहे असे म्हणता येईल. परंतु त्यांचे बाकीचे जे तत्त्वज्ञान आहे त्याची भिस्त श्रुतीवर, आविष्कृत शब्दावर नसते, ती असते शुद्ध तोवर. निदान तशी त्याची प्रतिज्ञा आणि प्रयत्नही असतो. याप्रमाणे अध्यात्मविद्या प्रामुख्याने शब्द आणि साक्षात्कार याच्या साह्याने मिळते, आणि तिला तर्काचीही जोड दिली जाते. आता या उपायांनी प्राप्त होणारे निष्कर्ष काय आहेत ते थोडक्यात पाहू. अध्यात्माच्या निष्कर्षांचा सारांश सांगण्याच्या मार्गात एक दुर्लंघ्य अडचण आहे. ती अशी की अध्यात्माच्या अनेक, अक्षरशः शेकडो, व्यवस्था आहेत. त्या सर्व परस्परांहून कमी अधिक भिन्न आहेत. परंतु प्रत्येक अध्यात्मव्यवस्था आपणच बरोबर आणि इतर सर्व चूक असा आग्रह धरताना आढळते त्यामुळे कोणते अध्यात्म बरोबर आणि कोणते चूक याचा निर्णय करणे अशक्य होते. या बाबतीत आध्यात्माची तुलना विज्ञानाशी करण्यासारखी आहे. कोणत्याही एका काळी विज्ञान काय आहे, म्हणजे विज्ञानाचे प्रस्थापित निष्कर्ष काय आहेत ते निश्चितपणे सांगता येते. **क्रमशः**

दि. य. देशपांडे

# जनावरांना कत्तलीसाठी नेणारा छोटा हत्ती पलटी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे रविवारी दुपारी 12:00 वाजेचे सुमारास फरदापूर येथे एक वाहन फरदापूर ते अजिंठा रोडवर हॉटेल गझल समोर पलटी झाला सदर वाहनातील चालक याने त्याचे ताब्यातील अशोक लेलँड छोटा हत्ती वाहन क्रमांक एम एच 20इएल 9965 मध्ये विनापरवाना जनावराची वाहतूक करून त्याच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता तसेच पशुवैद्यकीय अधिकारी करवी सदर जनावराची वैद्यकीय तपासणी न करता क्षमतेपेक्षा अधिक गाईची दाटीवाटीने व त्यांना उगाच वेदना किंवा यातना होतील अशा स्थितीत सदर गाईची भूक तहान अति गर्दी यामुळे केलेल्या वेदनाने पीडित करून कतलीच्या उद्देशाने आंतरराज्य मधून निर्दयतेने वाहतूक करून घेऊन जात असताना त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत रोडची परिस्थिती लक्षात न घेता भरदा वेगात वाहन चालून सदर वाहन रोडच्या कडेस डिव्हायडरला धडक देऊन पलटी केले व स्वतःचे व सहकारी यांचे दुखापतीस कारणीभूत झाले व कृषी पशुवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा क्र संकीर्ण2020/प्र.क.53/पदुम-4 दि.30/09/2022 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून पोस्टे फर्दापूर येथे गुन्हा रजि.क्र. 165/2022 प्रमाणे गुन्ह दाखल करण्यात आलेला असून जखमी गायींना वैद्यकीय उपचार करुन गोशाळेमध्ये भरती करण्यात आलेले आहे. पुढील तपास सपोनि डी.बी.वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना. निलेश लोखंडे हे पुढील तपास करीत आहेत.






# बीडीएस परीक्षेत प्रथम आलेल्या डॉ. यशश्री श्रीकांत देशमुख सुवर्ण पदकाने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी घेतलेल्या परीक्षेत छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाची बी. डी. एस. विद्यार्थिनी डॉ. यशश्री श्रीकांत देशमुख हिने ८१.६६ टक्के मार्क घेऊन महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन मानाचं सुवर्णपदक पटकावले आहे.

नुकताच औरंगाबाद येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (रिटायर्ड/ PVSM, AVSM, VSM) यांच्याहस्ते डॉ. यशश्री श्रीकांत देशमुख हिला सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. यशश्री श्रीकांत देशमुख दहावीला असताना उत्कृष्ठ विद्यार्थिनी म्हणून तर बी. डी. एस. असताना अनेक राज्यस्तरीय विविध स्पर्धत अनेक पारितोषिके प्राप्त केले आहे आणि टाटा हेल्थ अँड मेडिकल सायन्स रिसर्चनी रुपये १,११,००० ची स्कॉलरशिप देऊन तिचा गौरव करण्यात आला. तिने दररोज आठ ते दहा तास अभ्यास करून हे यश प्राप्त केले आहे.

सत्कार प्रसंगी लेफ्टनंट जनरल डॉ. राजीव कानिटकर (रिटायर्ड), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व्यवस्थापन कमिटी सदस्य डॉ. श्रीराम सावरीकर, डॉ हेडगेवार रुग्णालयाचे डॉ. अनंत पंढरे आणि छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आदी मान्यवर मोठ्या संख्येने हजर होते. तिच्या यशाचे कौतुक आणि अभिनंदन छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकर मुळे, दंत महाविद्यालय आणि रुग्णालय संचालक डॉ. सुभाष भोयर, प्रभारी अधिष्ठाता डॉ. लता काळे, डॉ. जयश्री देशमुख आणि दंत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील युवकाला विमा क्षेत्रातला एमडीआरटी अमेरिका पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सर्वोच्च पुरस्कार म्हणजे एमडीआरटी : अमेरिका हा अत्यंत प्रतिष्ठित असा आंतरराष्ट्रीय पुरस्कार असून सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल श्री विलास फकीरराव थोरात यांना जाहीर झाला आहे.. अमेरिकेत होणाऱ्या एमडीआरटीः2023 च्या जागतिक परिषदेमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. थोरात यांचे मूळ गांव औरंगाबाद जिल्ह्यातल्या वैजापूर तालुक्यातील विरगांव असून त्यांनाच्या उल्लेखनीय कामगिरी केल्याबदल यापूर्वीही दोन वेळेस त्यांच्या गावाला विमा ग्राम योजने अंतर्गत एलआयसी दोनही वर्षी कडून एक लाख रुपयांच्या निधी त्यांच्या गावाच्या विकासासाठी यापूर्वी खर्च केला आहे. ग्रामीण भागामध्ये विम्याचे महत्व काय असते हे पटवून देण्याचे कार्य चार वर्षापासून थोरात हे सतत करत आले आहे, विनम्र व तत्पर सेवा व लोकांचा विश्वासामुळे हे व व विकास अधिकारी स्वप्निल बोरसे यांच्या मुळे यश प्रधान करू शकलो असे थोरात म्हणतात .. हा पुरस्कार प्रदान झाल्याने एलआयसी परिवाराकडून व त्यांच्या कौटुंबिक व मित्र परिवाराकडून त्यांना भरभरून शुभेच्छा देण्यात आले.. औरंगाबादचे एका ग्रामीण भागातून या युवकाने अमेरिकेच्या सर्वोच्च पुरस्कार मध्ये घेतलेली गरुड झेप पाहून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# पहूरच्या चिमुकल्यांनी साधला पोलीसदादांशी संवाद



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित डॉ . हेडगेवार प्राथमिक विद्यालयाच्या चिमुकल्यांनी पहूर पोलीस ठाण्याला भेट देऊन पोलीस दादांशी संवाद साधला. भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून डॉ. हेडगेवार प्राथमिक विद्यालयाच्या चिमुकल्यांची पोलीस निरीक्षक प्रतापराव इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पहूर पोलीस ठाणे येथे क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी पोलीस उपनिरीक्षक संजय बनसोड आणि पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे यांनी पोलीस दलाच्या कार्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पोलीस दादा हे जनतेचे मित्र असतात . कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस सदैव कार्यमग्न असतात , असे सांगून चिमुकल्यांच्या मनात पोलीस दलाविषयी प्रेरणा निर्माण केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शस्त्रागाराला देखील भेट देऊन बंदूकीच्या कार्यप्रणाली विषयी माहिती जाणून घेतली. प्रदीप चौधरी यांनी बंदुकीच्या वापरासंबधी माहिती दिली. गोपनीय शाखे विषयी गोपाल माळी यांनी मार्गदर्शन केले. गुन्हे शाखे संदर्भात विनय सानप यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक अमोल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. पदवीधर शिक्षक युनूस तडवी यांनी आभार मानले. यावेळी पोलीस कर्मचारी राहूल जोहरे, रविंद्र देशमुख, अनिल राठोड, विनोद पाटील, सत्यवान कोळी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांना जेहुर- औराळा डांबरीकरणासाठी साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कित्येक वर्षांपासून खड्ड्यात हरपलेल्या जेहूर- औराळा रस्त्याचे डांबरीकरण मागणी साठी ग्रामस्थांनी थेट पालकमंत्री, राज्याचे ग्रामीण रोजगार हमी तथा फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांची भेट घेऊन साकडे घातले आहे.

कन्नड-वैजापूर राज्यमार्गाशी परिसरातील पन्नास खेडी जोडणार्या जेहुर- औराळा या सात कीमी. रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्याने पायी चालणे ही अवघड बनले आहे. या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या मागणी साठी जेहूर ग्रामस्थांनी तसेच वेगवेगळ्या संघटनांनी सतत आंदोलने उपोषणे करुण ही पोकळ आश्वासनां शिवाय पदरात काहीही पडले नाहीत. पावसाळ्यात रस्त्या वरील खड्ड्यांना तळ्याचे स्वरुप येते. हा खडतर रस्ता वयोवृद्ध नागरीक, गर्भवती महिला, गंभीर रुग्ण यां साठी मृत्युचा सापळा बनला आहे. खराब रस्त्यांमुळे परिसरातील दुर्गम भागातील अनेकांची लग्ने मोडली आहेत. आधीच कायम दुष्काळी पट्टा असलेल्या या भागाचा विकास खुंटला आहे. शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधीं कडे गाऱ्हाणे मांडून थकलेल्या ग्रामस्थांनी जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्याचे ग्रामीण हमी रोजगार तथा फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांची भेट घेऊण डांबरीकरण करण्या बाबद निवेदन सादर केले. याला सकारात्मक प्रतीसाद देत मंत्री संदिपान भुमरे यांनी तात्काळ मंत्रालयीन अधिकार्यांशी संपर्क साधत, या रस्त्या चे डांबरीकरण प्राधान्याने करण्याचे आश्वासन दिले.

# जामोद सरपंच, सचिवाच्या भ्रष्टाचाराविरोधातील उपोषणाची चौथ्या दिवशी सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** २५ नोव्हेंबर रोजी सर्वात मोठी आदिवासी बहूल ग्रामपंचायत जामोद येथे दलित वस्तीसह पंधरावा वित्त आयोग आणि विविध विकास कामांमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार ग्राम विकास अधिकारी आणि सरपंच यांचे संगनमताने झाला. सर्व कामे करताना गुणवत्ता नियंत्रण कक्षाचे बनावट अहवाल लावण्यात आले. १४० गाव पाणीपुरवठा अस्तित्वात असताना सुद्धा बोअरचे पाणी गावकऱ्यांना पाजून लक्षावधी रुपयाचे देयके सरपंच, सचिवांनी काढली. गावात किडनिग्रस्थ रुग्णांची संख्या वाढली. लक्षावधी रुपयाची हायमास्ट लाईट लावून फार मोठा गैरप्रकार केला. हे सर्व करीत असताना ग्रामपंचायत कामे करीत आहे, असे दर्शवून सरपंच पुत्राचा हस्तक्षेप ह्यामध्ये वाढला. ह्या सर्व कामांची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून उच्चस्तरीय चौकशी करावी, ह्या मागणीसाठी जामोद चेक मागासवर्गीय सदस्य पती गौतम गवई यांनी २१ नोव्हेंबरपासून सुरू केलेल्या उपोषणाची दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पंचायत विस्तार अधिकारी राजपूत, शाखा अभियंता विनय घिवे यांचे उपस्थितीत ग्रामविकास अधिकारी परमेशवर कस्तुरे यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर सांगता झाली. ह्या सर्व कामांची खातेनिहाय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश यापूर्वीच गटविकास अधिकारी संजय पाटील यांनी दिले होते. गौतम गवई यांचे उपोषण दुसरे दिवशी २२नोव्हेंबर रोजी सोडवण्यासाठी विस्तार अधिकारी राजपूत आणि ग्रामविकास अधिकारी परमेश्वर कस्तुरे त्या ठिकाणी पोहोचले, परंतु उपोषण सोडवण्यासाठी



लेखी देण्यासाठी सरपंच त्यांनी उपोषण मंडपात येण्यास असमर्थता दर्शवली. समाधान दामधर यांनी त्यावेळी विस्तार अधिकारी यांना दमदाटी करून तुम्ही उपोषण सोडवण्यासाठी का आले? गावात राजकारण का करता, अशा भाषेत सुनावल्यामुळे विस्तार अधिकारी व सचिव तेथून निघून गेले. परिणामी उपोषण सुरूच राहिले. दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत गावामध्ये विविध ठिकाणी काँक्रेट रस्ता व पेवर ब्लॉकचे कामे झाले असले तरी तत्कालीन शाखा अभियंता, सचिव आणि सरपंच यांनी संगम मताने भ्रष्टाचार व गैरप्रकार केला. सदर कामांमध्ये गौण खनिज हे ४०/८०एमएम वापरायला हवे असले तरी तेथे फक्त हार्ड मुरूम वापरण्यात आला. पी.एम.जी.एस.वाय अंतर्गत बुलढाणा येथे गुणवत्ता दक्षता पथक कार्यरत असून तेथील अधिकाऱ्यांनी येथे न येता जागेवरच बनावट चाचणी अहवाल सादर केले. ४०/८०एमएम गौण खनिज ऐवजी हार्ड मुरूम वापरून कोट्यावधी रुपयाची बचत करून त्या पैशाचा अपहार केला.

सदर कामांमध्ये रॉयल्टी किती प्रमाणात भरण्यात आली. जीएसटी आणि इतर करांचा काय भरणा झाला. सरपंच, सचिव, अभियंता यांचे कमिशन किती ?या सर्व प्रकाराची चौकशी करण्यासाठी ह्या पुढे सुद्धा तीव्र आंदोलन करणार असून यासाठी लवकरच जी.प.च्या मुख्य कार्यपालन अधिकारी, जि.प.चे कार्यकारी अभियंता, गुणवंता नियंत्रण कक्षाचे अमरावती येथील अधीक्षक अभियंता यांची भेट घेणार असल्याचे गौतम गवई यांनी सांगितले.

# मोदींना विश्वास

आधुनिक केसरी

'जी २०' या सामर्थ्यशाली राष्ट्रगटाचे अध्यक्ष भूषणवण्यासाठी भारत सज्ज झाला आहे. ही जबाबदारी पेलताना विश्वकल्याणासाठी काम करण्याची संधी भारताला उपलब्ध झाली आहे. विश्वशांती, एकात्मता, पर्यावरण आणि शाश्वत विकासाला भेडसावणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देऊन त्यातून मार्ग काढण्याच्या उपाययोजना भारताकडे आहेत," असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 'मन की बात' या आकाशवाणीवरील ९५ व्या मासिक संवादसत्रात व्यक्त केला. भारताकडे १ डिसेंबर रोजी 'जी-२०' राष्ट्रगटाच्या अध्यक्षपदाची सूत्रे अधिकृतरित्या येणार आहेत. त्याचा संदर्भ देत मोदी म्हणाले, की 'जी-२०' चे अध्यक्षपद ही भारतासाठी मोठी सुसंधी आहे. यासाठी भारताने 'एक वसुंधरा, एक कुटुंब व एक भविष्य' हे सूत्र दिले आहे. त्यात 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारताची कटिबद्धता प्रतिबिंबित होते. 'जी-२०' राष्ट्रगटातील सदस्य राष्ट्रांची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या दोन तृतीयांश आहे. जागतिक व्यापाराचा तीन चतुर्थांश वाटा या गटातील सदस्य राष्ट्रांचा आहे. जागतिक स्तरावरील सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ८५ टक्के वाटा या गटाच्या सदस्य राष्ट्रांचा आहे. या राष्ट्रगटात भारतासह अमेरिका, ब्रिटन, चीन, रशिया, जपान, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अर्जेंटिना, ब्राझील, इंडोनेशिया, इटली, दक्षिण कोरिया, मेक्सिको, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्कस्थान आणि युरोपियन संघातील देशांचा समावेश आहे. यावरून आपण कल्पना करू शकता की एका मोठ्या सामर्थ्यशाली आणि प्रभावी राष्ट्रांच्या गटाचे अध्यक्षपद भारत १ डिसेंबरपासून भूषवणार आहे, असे सांगून मोदी म्हणाले, की भारत आणि प्रत्येक भारतीयासाठी ही फार मोठी संधी मिळाली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतकाळात भारताला ही जबाबदारी भूषवता येणार असल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. या सुसंधीचा चांगला उपयोग करून आपण विश्वकल्याणार्थ करुयात. विश्वशांती असो व एकात्मता, पर्यावरणाविषयी संवेदनशील जागृती असो किंवा शाश्वत विकासाची आव्हाने असोत, भारताकडे या सर्व आव्हानांना तोंड देऊन त्यातून मार्ग काढण्याची क्षमता आहे. सर्वांचे कल्याण व्हावे, सर्वत्र शांतता व समृद्धी- समाधान नांदावे यासाठी भारत कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. तेलंगणातील हरिप्रसाद यांनी विणकामाद्वारे 'जी-२०'चे बोधचिन्ह आपल्याला पाठवले आहे. ही माझ्यासाठी अनमोल भेट असल्याचे गौरवोद्गार काढून मोदी म्हणाले, की 'जी-२०'संदर्भातील विविध कार्यक्रम येत्या काही दिवसांत देशभरात विविध ठिकाणी आयोजित करण्यात येतील. या काळात जगातील विविध भागांतील महत्त्वाच्या व्यक्ती भारतातील विविध राज्यांना भेटी देतील. या काळात आपल्या राज्यांत येणारे विदेशातील नागरिक जरी त्या देशांचे प्रतिनिधी असतील तरी आगामी काळात ते आपल्या देशात पर्यटक म्हणून पुन्हा भेट देऊ शकतात, हे सर्वांनी ध्यानात ठेवावे. आपण आपल्या संस्कृतीचे वैविध्य आणि खास वैशिष्ट्यांचे त्यांना दर्शन घडवू, याची मला खात्री आहे. 'जी-२०'संदर्भातील उपक्रमांत कोणत्या ना कोणत्या मार्गाने जनतेने आणि विशेषत: तरुणांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही मोदींनी केले.

# संजय राऊत देवादिकांच्या मुळावर का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचं राजकारण काही राजकिय नेते कोणत्या प्रश्नाभोवती फिरवतील याचा नेम लागु शकत नाही. कधी महिलांना राजकारणात ओढतील तर कधी साक्षात परमेश्वरालासुद्धा. अलीकडे तर राजकिय मतलबापोटी परमेश्वराच्या गळ्यालाच राजकारणाचा फास लावल्यासारखी परिस्थिती दिसुन येते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आसामच्या कामाख्या देवी दर्शनासाठी गेल्यानंतर उठलेला गदारोळ बालिशपणाच म्हणावा लागेल. शिवसेना खा.संजय राऊत यांनी तर शब्दफेकीची परिसीमाच गाठली म्हणावी लागेल.**

महाराष्ट्रात देव नाहीत का? असं म्हणत माध्यमाचं लक्ष्य वेधण्यासाठी लावलेला आरोप अंगलटही आला. कारण अनेकदा संजय राऊत तिरूपती बालाजीला जावुन आल्याचं कळतं. एव्हाना महाराष्ट्राबाहेर जावुन त्यांनी अनेकदा इतर देवाचेही दर्शन घेतले. प्रश्न हा आहे तुमच्या राजकिय स्वार्थापोटी परमेश्वराच्या गळ्याला फास का आवळता? भक्ती, श्रद्धा एकाच नाण्याच्या बाजु तर भुतलावर जळीस्थळी देवाचं असलेले अस्तित्व एकच असून श्रद्धा वेगवेगळी असते. भाविक भक्तांच्या श्रद्धेला सीमावादाचा जोड देणं हा खरं तर राजकिय अघोरीपणाच म्हणावा लागेल. कदाचित अशा शापित वक्तव्यामुळे तुरूंगवारी 100 दिवसाची भोगावी लागली असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.

राजकिय जीवनात नव्हे तर आपल्या आयुष्यात कुठल्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी आणि मिळाल्यानंतर भारतीय हिंदु संस्कृतीत लोक आपल्या श्रद्धा प्रकट करीत असतात. महाराष्ट्र ही साधु संतांची भुमी आहे. पाऊस जरी पडला तरी वारकरी आषाढीची पायी यात्रा करून आल्यानंतर पाऊस पडेल अशी भक्ती असते. म्हशीनं दुध नाही दिलं, गायीनं लाथ मारली, पुत्र प्राप्ती झाली नाही, परीक्षेत लेकरू पास होण्यासाठी, नोकरी लागण्यासाठी एवढेच नव्हे तर गावच्या सोसायटीचा चेअरमन, सरपंच इथपासुन राज्याचा मुख्यमंत्री आणि देशाचा पंतप्रधान होण्यापर्यंत प्रत्येक जण आपआपल्या श्रद्धा, भक्ती असलेल्या देवावर ठेवत असतो. कारण हिंदु संस्कृती रूढी परंपरेनुसार चालते. लग्नात अंगाला हाळद का लावतात?अक्षदा पडण्याच्या अगोदर गणपती पुजन का करतात? आणि सुनबाई घराचा उंबरठा ओलांडताना तांदुळ डब्बा ढकलुन का प्रवेश करते? समाज जीवनातील हे सारे संकेत शुभ अशुभाशी जोडले जातात. अमोल मिटकरीसारख्या वाचाळवीरांना ब्राह्मणाविना विवाह कार्य करावं वाटतं पण आपल्याच लग्नात किंवा आपले घरचे कार्य ब्रह्मदेवतेकडून करवुन घेतात त्यालाच राजकारण म्हणतात.

संजय राऊतांनी सद्या महाराष्ट्राच्या राजकारणात देवादिकांच्या दर्शनावर आक्षेप घेतले. वास्तविक पहाता हा बालिशपणा म्हणावा लागेल. मुख्यमंत्री एकनाथ



शिंदेंनी भविष्याकडे जावुन हात पाहिला. शिर्डीचे दर्शन घेतले. एवढेच नाही तर आसामच्या प्रसिद्ध कामाख्या देवीदर्शनासाठी मंत्रीमंडळाला घेवुन गेले. गंमत बघा, कामाख्या दर्शनवारीवर शरदचंद्रजी पवार किंवा इतर कुणी बोलले नाहीत. विरोधी पक्ष नेते अजित पवारांनी तर दर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.मग शिवसेनेच्या पोटात गोळा का आला? त्याचं कारण पक्षातुन बाहेर पडलेले 40 आमदार यांच्या पावला पावलावर लक्ष्य ठेवायचं आणि केवळ बदनामी करण्याच्या दृष्टीने उठसुठ आरोप करायचे. यापेक्षा दुसरं काहीच नाही.

राऊतांना कामाख्या देवी प्रसन्न झाली नसेल आणि हो त्याहुन अधिक त्यांची सत्ता देवीच्या आशिर्वादाने गेली तोही भाग असु शकतो.कारण मुख्यमंत्री होण्याअगोदर एकनाथ शिंदे आणि 40 आमदार ज्यांनी राजकिय कटशहाचे राजकारण त्याच देवीच्या सान्निध्यात रचले. त्यांना देवी पावली. परिणामी ठाकरे सरकार कोसळले. गंमत कशी असते बघा? लेकरू सातवीला पास झाल्याबरोबर आपल्या ग्रामदैवतेला नतमस्तक होते. हा सृष्टीचा नियम आहे. कारण आयुष्यात कुठे तरी भावना जपाव्याच लागतात. राजकारणात तर पावला पावलावर सारेच जण भविष्य पहातात. नव्हे तर त्यांना शोधुन हात दाखवत असतात.

आज संजय राऊत सत्ताधाऱ्यांच्या कृतीवर आरोप करत असले तरी महाराष्ट्राबाहेर जावुन संजय राऊतांनीच काय? त्यांचे नेते उद्धव ठाकरे सपत्निक आदित्य बाळासह महाराष्ट्राबाहेर अनेकदा दर्शनासाठी गेले नाहीत असं नव्हे. तिरूपती बालाजी अगदीच महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला पण अनेकदा ही मंडळी तिथे गेलेलीच आहे. मग यांना आपलं सुंभय जळतं आणि सुतही जळतं असा भाव मनोमन प्रकटीत होतो. केवळ राऊतांनी नव्हे तर शिवसेनेच्या अनेक वाचाळवीरांनी कामाख्या देवीच्या दर्शनावर आक्षेप घेतले. पण या मंडळींची श्रद्धा अटकेपार आहेच. कुणी वैष्णवी देवीला गेलं असेल तर कुणी ओंकारेश्वरला पण आज धुतल्या तांदळासारखी भाषा जणु काही आम्ही महाराष्ट्राच्या बाहेर जावुन कधीच मस्तक टेकवले नाही या आविर्भावात राऊत बोलतात त्याचं नवलं वाटतं. शेवटी राजकारण एक वैचारिक संस्कृती असते. कुठल्या प्रश्नावर करावं? काय बोलावं? याला काही मर्यादा असतात. अर्थात ठाकरे शिवसेनेकडून सभ्य राजकारणाची भाषा याची अपेक्षा करणं मुळात योग्य नव्हेच. प्रश्न कामाख्या देवीच्या दर्शनाचा. मग यांच्या पोटात गोळा का? स्थानिक पातळीवर वेगवेगळे ग्रामदैवत असतात. कुलदैवत असतात. मग हे सोडुन देखील कुणी पांडुरंगाच्या दर्शनाला जातं कुणी शिर्डीच्या साईबाबा दर्शनाला जात तर कुणी सिद्धीविनायकाच्या दर्शनासाठी जातं. कारण भक्ती आणि श्रद्धा याला कुठल्याही सीमा नसतात. राजकारण सीमा प्रश्नावर निश्चित कुणी करत असेल पण परमेश्वराच्या भक्तीला सीमा नसतात. कारण तो चराचरावर विराजमान झालेला आहे. अस्तित्व अणुरेणुपेक्षाही मोठं. पण बिचाऱ्या राऊतांना अध्यात्मिक ज्ञानापेक्षा किंवा भक्ती श्रद्धेपेक्षा राजकिय धुरवड यातच जास्त मजा वाटते. वैयक्तिक जीवनात संकटे आल्यानंतर कुणी कितीही बादशहा असला तरी नतमस्तक झाल्याशिवाय रहात नाही.

जेलमधुन संजय राऊत सुटल्याबरोबर अगोदर त्यांनी मुंबईतल्या सिद्धी विनायक मंदिरात जावुन दर्शन घेतलं. एकनाथ शिंदे बिचारा साधा भोळा महाराष्ट्राला लाभलेला मुख्यमंत्री ज्याची वाढत असलेली लोकप्रियता ठाकरे गटाच्या शिवसेनेला डोळ्यांनी पहाणं सहन होत नाही तो भाग वेगळा. म्हणुन मुख्यमंत्र्याच्या पावलापावली लक्ष्य ठेवायचं. काही जरी नाही सापडलं तरी उगच छाती बडवत उर आपटुन घ्यायचं अशी सवय अलीकडे शिवसेनेच्या अनेक वाचाळवीरांना लागलेली दिसते. पण शिंदे मात्र कुठल्याही आरोपाची तमा न बाळगता सामान्य जनतेच्या कल्याणासाठी रस्त्यावर उतरून भुमिका निभावताना दिसतात. ही सर्व पार्श्वभुमी पहाता एक मात्र निश्चित म्हणावे लागेल राजकिय फास आपल्या विरोधात विरोधकांच्या गळ्यात निश्चित टाकावा कारण राजकारण ते राजकारण असतं आणि तिथे मात्र स्वहितापुढे कुणी कुणाचं बघत नसतं. खंत याची निश्चित वाटत असेल महाराष्ट्रातल्या सामान्य जनतेला. तुमच्या राजकारणासाठी परमेश्वराच्या गळाला फास का टाकता? कारण मानवी जीवनात भक्तीला अंतर आणि सीमा नसतात. अगदी परदेशात रहाणारे भारतीय किंवा परदेशी हे देखील अधुनमधुन मायदेशी आल्याबरोबर आपल्या ग्रामदैवतेचं दर्शन घेतात. आसाममधुन कितीतरी भाविक तुळजापुर, पंढरपुर, शिर्डी, कोल्हापुर येथे येवुन अंबामातेचे दर्शन घेतात. दुर्गेचे अवतार वेगवेगळे जसे असतात कदाचित कामाख्य देवीसुद्धा त्यापैकीच आसाम राज्यातला जागृत अवतार असेल. तिथे जावुन दर्शन घेतले तर बिघडले कुठे? प्रत्येक भाविक आपल्या जीवनात ज्या देवाचा अनुभव आला तिथे जावुन नतमस्तक होतात. संजय राऊत जेलमधुन मग सिद्धीविनायकाला का गेले?शेवटी श्रद्धा महत्वाची असते. तिला सीमा नसतात. हे ठाकरे शिवसेनेच्या वाचाळवीरांनी लक्षात घ्यायला हवं.

# .... याला प्रेम कसे म्हणावे ?



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मुंबईत राहणाऱ्या श्रद्धा वाळेकर या तरुण मुलीचा तिचाच प्रियकर असलेल्या आफताब पुनावाला नावाच्या मुलाने दिल्लीत क्रूरपणे हत्या केली. अर्थात त्याचा हा गुन्हा क्रूरपणापेक्षाही मोठा आहे. सैतानालाही लाजवेल अशा क्रूरपणे त्याने श्रद्धाची हत्या करून तिच्या शरीराचे ३५ तुकडे केले व मृतदेहाचे ते ३५ तुकडे २० दिवस फ्रिजमध्ये ठेवून त्याची विल्हेवाट लावली. अतिशय थंड डोक्याने केलेल्या या हत्याकांडानंतर देशभर संतापाची लाट उसळली असून क्रूरकर्मा आफताबला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी होत आहे अर्थात त्याला कायद्याने कठोरात कठोर शिक्षा होईलच पण या निमित्ताने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांची उत्तरे आधी शोधावी लागेल. श्रद्धा आणि आफताब यांचे प्रेम होते. पण हेच प्रेम श्रद्धाचा जीव घेऊन गेला. आजची तरुण पिढी प्रेमाच्या नावाखाली किती किती आणि कशी भरकटत चालली आहे.**

प्रेमाच्या नावाखाली स्वतःचा कसा सत्यानाश करून घेत आहे हेच या घटनेतून दिसून आले. वास्तवीक प्रेम ही अतिशय पवित्र गोष्ट आहे पण आफताब सारख्या प्रेमरोग्यांमुळे प्रेमासारखा पवित्र शब्दही बदनाम होत आहे. श्रद्धाच्या पालकांनीही श्रद्धाला आफताबशी प्रेम संबंध ठेवण्यास विरोध केला होता मात्र आफताबच्या प्रेमात वेड्या झालेल्या श्रद्धाने आपल्या पालकांचेही ऐकले नाही. आपले आई वडील हे आपल्या चांगल्याचाच विचार करतात हे आजच्या पिढीला मान्य नाही. आम्ही सज्ञान झालो म्हणजे आम्ही आमचा निर्णय घेण्यास सक्षम आहोत अशा आविर्भावात वावरणारी आजची पिढी पालकांच्या मताला किंमत देत नाही त्यामुळेच असा अनर्थ घडतो. जर श्रद्धाने तिच्या आई वडिलांचे ऐकले असते तर आज ती या जगात असती पण आई वडिलांचे न ऐकता आफताबसोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचा निर्णय तिने घेतला.

लिव्ह इन रिलेशनशिप सध्या फॅशन बनली आहे. लग्नाशिवाय एकत्र राहायचे पटलं तर ठीक नाही तर वेगळे व्हायचे असा हा सारा मामला. बरे आता लिव्ह इन रिलेशनशिपला कायद्यानेही मान्यता दिली आहे त्यामुळे कोणी त्यावर आवाजही उठवू शकत नाही. काही जण तर लिव्ह इन रिलेशनशिपकडे विवाह संस्थेला पर्याय म्हणूनही पाहत आहेत पण त्यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. विवाह संस्थेला कायदेशीर आणि सामाजिक बंधन असतात. जबाबदारी आणि कर्तव्याची जाणीव असते. प्रेम, त्याग आणि तडजोडीबरोबरच विवाहात समर्पणभावही असतो या उलट लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये कसलेही बंधन नसते, जबाबदारी नसते असते ती उन्मक्त आणि बंधनमुक जीवन. हेच बंधनमुक आणि उन्मक्त जीवन तरुण पिढीच्या ऱ्हासाचे कारण ठरत आहे. आजची तरुण मुले मुली त्यातही उच्चशिक्षित आणि उच्चभ्रू कुटुंबातील मुले मुली कायदेशीर बंधनामुळे विवाहापासून दूर जाऊ लागली आहेत. जबाबदारी न स्वीकारता बंधनमुक जीवन जगता येते म्हणून ते लिव्ह इन रिलेशनशिपचा पर्याय स्वीकारु लागली आहेत. याला काही जण सामाजिक सुधारणा म्हणतील पण माझ्या मते ही सामाजिक सुधारणा नसून विवाह संस्थेवर घातलेला घाला आहे. प्रेम कोणतेही असो मग ते पती पत्नी मधील



असो की लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या जोडप्याचे प्रेमाला मर्यादा असतातच. एका ठराविक काळानंतर प्रेम कमी होऊ लागते लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या जोडप्याला त्यामुळेच सुरक्षिततेचा अभाव वाटतो कारण प्रेमाशिवाय त्यांना काहीच माहिती नसते या उलट विवाहात प्रेमासोबतच त्याग, समर्पण आणि जबाबदारीची जाणीव असते त्यामुळे छोट्या मोठ्या कुरबुरीचे मोठ्या वादात रूपांतर होत नाही आणि झाले तरी कुटुंबातील जेष्ठ व्यक्तींच्या सल्ल्याने तो वाद निकालात काढला जातो. लिव्ह इन मध्ये दोघेच असल्याने कोण बरोबर कोण चूक हे तिसऱ्या माणसाने सांगण्याचा प्रश्नच येत नाही त्यामुळेच छोट्या मोठ्या कुरबुरीचे मोठ्या वादात रूपांतर झाले, वाद वेळीच मिटला नाही तर ते बेफाम होतात. मनात सैतानी विचार निर्माण होतात त्यातूनच मग असा क्रूर प्रकार करण्यासही तरुण मागेपुढे पाहत नाही. त्यामुळेच आजच्या तरुण पिढीने बंधनमुक, जबाबदारी विरहित, उन्मक्त जीवन ( लिव्ह इन रिलेशनशिप ) हवे की त्याग, समर्पण आणि जबाबदारीची जाणीव असलेले ( वैवाहिक ) जीवन हवे हे ठरवावे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कोण होते टाटा एरलाईन्सचे मालक ?




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा उर्फ जे.आर.डी.टाटा हे भारतीय उद्योजक होते. ते पहिले भारतीय वैमानिक असून भारतातील विमान वाहतूक उद्योगाचे जनक मानले जातात. जेआरडींना त्यांच्या हयातीत अनेक पुरस्कार मिळाले. भारतीय केंद्रशासनातर्फे त्यांना इ.स.१९५७ साली पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले, तर इ.स.१९९२ साली त्यांना भारतरत्न या भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाने भूषवण्यात आले. सन २०१२मध्ये झालेल्या आऊटलुक इंडियाच्या दी ग्रेटेस्ट इंडियन या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये टाटा सहाव्या क्रमांकावर होते. त्यांच्या कार्याची रोचक माहिती श्री एन. के. कुमार जी. गुरुजींच्या सदर लेखात अवश्य वाचा.**

प्रथम थोडक्यात कर्तबगार टाटा घराण्याचा इतिहास जाणू या. भारतातील लोखंड व पोलाद उद्योगाचा पाया घालणारे, तसेच भारताच्या औद्योगिक प्रगतीकरिता कापडगिरण्या, जलविद्युत् प्रकल्प उभारणारे जगप्रसिद्ध कारखानदार, व्यापारी, दानशूर व देशभक्त असे टाटा घराणे. टाटा उद्योगसमूहाचे संस्थापक जमशेटजी नसरवानजी होते. त्यांचे दोन सुपुत्र सर दोराबजी व सर रतनजी. जमशेटजींचे पुतणे जहांगीर रतनजी दादाभाई- जेआरडी हे या घराण्यातील धडाडीचे, कल्पक व दीर्घोद्योगी असे कर्ते पुरुष होत. एकाच घराण्यातील तीन कर्तबगार पिढ्यांनी घडवून आणलेला देशाचा प्रचंड औद्योगिक विकास, ही एक अनन्यसाधारण वस्तुस्थिती होय. टाटा घराण्याचे कर्तबगार चतुष्टय संस्थापक जमशेटजी, दोराबाजी, रतनजी व जेआरडी हे होत. टाटा उद्योगाचे आद्य प्रवर्तक जमशेटजी नसरवानजी कार्यकाळ ३ मार्च १८३९-१९ मे १९०४ यांचा जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे एका पारशी घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांची मुंबईत व्यापारी पेढी होती. वयाच्या तेराव्या वर्षी ते शिक्षणासाठी मुंबईस आले. १८५६-५८ या काळात त्यांनी एल्‌फिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण घेतले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व दिनशा वाच्छा हे त्यांचे सहाध्यायी होते. सन १८५८मध्ये ते एल्‌फिन्स्टनमधून ग्रीन स्कॉलर- पदवीप्राप्त म्हणून उत्तीर्ण झाले. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांचा करसेटजी डाबू या पारशी गृहस्थांच्या हीराबाई या कन्येशी विवाह झाला. दोराबजी व रतनजी हे त्यांचे पुत्र. सन १८५९मध्ये जमशेटजी आपल्या वडिलांच्या व्यवसायात शिरले. याच सुमारास हाँगकाँगच्या जमशेटजी अँड अर्देशिर या शाखेच्या व्यवहारात लक्ष घालण्यासाठी त्यांना तेथे पाठविण्यात आले. तेथूनच पुढे ते शांघायला गेले व तेथे त्यांनी दुसरी शाखा उघडली. सन १८६५मध्ये यंत्रविद्येचे ज्ञान मिळविण्यासाठी ते मँचेस्टरला गेले. इंग्लंडमध्ये ते चार वर्षे होते. स्वदेशी परतल्यावर त्यांनी मुंबईच्या चिंचपोकळी भागातील दिवाळे निघालेली एक तेलगिरणी विकत घेऊन तिचे कापडगिरणीत रूपांतर केले. तिचे ॲलेक्झांड्रा मिल असे नामकरण करून त्यांनी आपल्या औद्योगिक कारकीर्दीस प्रारंभ केला. या पहिल्याच उपक्रमामुळे त्यांना कीर्ती व संपत्ती या दोहोंचाही लाभ झाला. त्यांनी ही भरभराटीस आणलेली गिरणी विकून टाकली. यानंतर मोठ्या आकारामानाची कापडगिरणी स्थापण्याचा संकल्प सोडून ते कापडउद्योगाचे अधिक शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविण्याकरिता पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे फिरोजशहा मेहतांशी त्यांचा घनिष्ठ स्नेह जडला. सन १८७४मध्ये भारतात परतल्यावर अनेक मित्रांचा विरोध असूनही जमशेटजींनी मुंबईऐवजी नागपूर येथे एम्प्रेस मिल्स ही कापडगिरणी सुरू केली. एम्प्रेस मिल्सच्या स्थापनेपासूनच त्यांनी कामगारकल्याण योजना कार्यान्वित केल्या. कुर्ला येथील धरमसी मिल ही जुनी गिरणी विकत घेऊन तिचे स्वदेशी मिल्समध्ये रूपांतर केले व कापडधंद्याचा विस्तार केला. त्याच वर्षी त्यांनी अहमदाबाद येथील ॲडव्हान्स मिल्स ही कापडगिरणी भरभराटीस आणली. स्वदेशी मिल्स या गिरणीच्या रूपाने त्यांची स्वदेशी चळवळीबद्दल वाटणारी आस्था प्रकट झाली, तर ॲडव्हान्स मिल्सच्या रूपाने त्यांचा कापडउद्योगातील आधुनिकीकरणाचा दृष्टिकोन दिसून आला. भारतीय कापडउद्योगाचे आधुनिकीकरण करण्याचे श्रेय जमशेटजींना द्यावे लागते. त्याच्याच अनुषंगाने भारतात लांब धाग्याच्या कापूस उत्पादनासही त्यांनी प्रयत्न केले.

जमशेटजींनी आपल्या औद्योगिक ध्येयवादात स्वदेशाच्या आणि स्वकीयांच्या गरजांची जाणीव सतत राखली होती. त्यांनी दूरदृष्टीने टाटा सन्स लि. या संस्थेची स्थापना करून तिच्याकडे आपल्या सर्व कंपन्यांचे व्यवस्थापन सोपविले. या संस्थेचे ८५ टक्के भांडवल टाटा कुटुंबातील मंडळींनी उभारलेल्या धर्मादाय न्यासांच्या मालकीचे असल्याने टाटा उद्योगसमूहातील विविध उद्योगांना आणि संस्थांना होणारा फायदा न्यासांकडे म्हणजे पर्यायाने जनतेकडे पोहोचविला जातो. भारतातील आधुनिक उद्योगधंद्यांचे प्रवर्तन जमशेटजींनी केले. इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीने जर हिंदुस्थानला जावयाचे असेल, तर त्याचे औद्योगिक कार्यक्षेत्र विस्तृत झाले पाहिजे हिंदुस्थानची भौतिक उन्नती होण्याचा शक्य कोटीत असणारा मार्ग हाच आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. व्यवहारी दृष्टीबरोबरच कल्पकता, उपक्रमशीलता, समयोचितता, धाडसीपणा आणि निकोप व्यापारी दृष्टी ह्या गुणांमुळेच जमशेटजींना अपार यश लाभले. रूढ धंद्यांपेक्षा नवेनवे औद्योगिक क्षेत्र शोधण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. राष्ट्रीय व आर्थिक पारतंत्र्याच्या काळात स्वदेशीच्या संकल्पनेला सिद्धीचे रूप देण्यात, देशातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या शोधाकरीता व विकासाकरिता प्रचंड श्रम घेण्यात आणि वैज्ञानिक अन्वेषणाची प्रेरणा देण्यात जमशेटजी टाटा हे अग्रभागी होते. देशातील खनिजसंपत्तीचा शोध व



विकास हा देशातील लोकांनीच देशी भांडवलाच्या साहाय्याने घडवून आणला पाहिजे, या मतावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. यशस्वी उद्योगपती तसेच व्यापारी असूनही त्यांचे औदार्य व दानशूरत्व अनन्यसाधारण होते. औद्योगिक क्रांतीच्या काही अनिष्ट परिणामांचेही त्यांना यथार्थ भान होते. त्यांपासून आपल्या कारखान्यांतील कामगारांना वाचविण्यासाठी कामगार-कल्याणाच्या अनेक योजना त्यांनी अंमलात आणल्या. ग्रंथ वाचणे व टिपणे काढणे, हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांच्या सर्व लहानमोठ्या औद्योगिक प्रकल्पांना त्या त्या उद्योगधंद्यातील

**(जे.आर. डी. टाटा पुण्यस्मृती)**

अद्ययावत ज्ञानाचे अधिष्ठान होते. नाउहाइम- प.जर्मनी येथे वयाच्या पासष्टाव्या वर्षी या महान उद्योगपतीचे निधन झाले. त्यांच्या पश्चात सर दोराबजी व सर रतनजी या त्यांच्या दोन मुलांनी वडिलांची परंपरा यशस्वीपणे पुढे चालविली. सर रतनजींचे पुत्र जेआरडी होत.

जे.आर.डी.टाटांचा जन्म दि.२९ जुलै १९०४ रोजी पॅरिस, फ्रान्स येथे झाला. रतनजी दादाभॉय टाटांचे ते दुसरे पुत्र होते. मुंबईतील कॅथेड्रल अँड जॉन केनॉन स्कूल येथे काही वर्ष ते शिकले, पण टाटांची आई फ्रेंच असल्यामुळे त्यांचे बालपण मुख्यतः फ्रान्समध्येच गेले. काही कारणाने ते मॅट्रीक परीक्षेनंतर शिकू शकले नाहीत. इंग्लिश खाडी विमानाद्वारे पहिल्यांदा पार करणारे सुप्रसिद्ध फ्रेंच वैमानिक लुईस ब्लेरिअट यांच्या जीवनकार्याने जेआरडी खूप प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनीही विमान शिकण्याचा ध्यास घेतला. इ.स.१९२९ साली त्यांनी वैमानिकाचा परवाना मिळवला. वैमानिकाचा परवाना मिळवणारे ते पहिले भारतीय ठरले. इ.स.१९३२ साली त्यांनी टाटा एरलाईन्स या पहिल्या भारतीय प्रवासी विमान वाहतूक कंपनीची स्थापना केली. पुढे इ.स.१९४६ साली तिचे नाव बदलून एर इंडिया ठेवले गेले. वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी म्हणजे इ.स.१९३८ साली ते टाटा सन्स उद्योगसमूहाचे चेअरमन बनले. ते प्रदीर्घ काळ त्या पदावर होते. त्यांनी पदभार सांभाळला तेव्हा टाटा सन्स उद्योगसमूहाच्या १४ कंपन्या होत्या. टाटांच्या काळात ९१ कंपन्यांची भर पडली. रसायन, वाहन, चहा, माहिती, हॉटेल आणि तंत्रज्ञान अशा नवीन क्षेत्रांत त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा विस्तार केला. त्यांच्या पुढाकाराने इ.स.१९५६ साली कंपनीतील कामगारांच्या कल्याणासाठी खास योजना राबविण्यात आली. त्यामध्ये दिवसातून आठ तास काम, मोफत आरोग्यसेवा, भविष्य निर्वाह निधी आणि अपघात विमा योजना अशा पायाभूत गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. पुढे या योजना भारतीय केंद्र शासनाने सर्व उद्योग-व्यवसायांसाठी कायदेशीर रित्या बंधनकारक केल्या. उद्योगसमूहाच्या विस्ताराबरोबरच इतर अनेक संस्था स्थापन झाल्या. भारतात मूलभूत संशोधन व्हावे म्हणून त्यांनी इ.स.१९३६ साली टाटा समाजविज्ञान संस्था आणि इ.स. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्था या संशोधनसंस्था स्थापण्यात पुढाकार घेतला. आशियातील पहिले कर्करोग रुग्णालय इ.स.१९४१ साली मुंबईत सुरू केले.

जेआरडींना त्यांच्या हयातीत अनेक पुरस्कार मिळाले. भारतीय केंद्रशासनातर्फे त्यांना इ.स.१९५७ साली पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले, तर इ.स.१९९२ साली त्यांना भारतरत्न या भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाने भूषवण्यात आले. सन २०१२मध्ये झालेल्या आऊटलुक इंडियाच्या दी ग्रेटेस्ट इंडियन या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये टाटा सहाव्या क्रमांकावर होते. दि.२९ नोव्हेंबर १९९३ साली वयाच्या ८९व्या वर्षी जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. !! पुण्यस्मरण म्हणून त्यांना व त्यांच्या कार्यकर्तृत्वाला विनम्र अभिवादन !!

# शिक्षणांचे महत्त्व पटवून देणारे समाजसुधारक

आधुनिक केसरी

**विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।। बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा जोतिबांनी निश्चय केला. इ.स. १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत असणाऱ्या भिडे वाड्यात मुलींची पहिली मराठी शाळा जोतिबांनी स्थापन केली. या शाळेतील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यावर सोपविली. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणावे, यावर भर देण्यात आला.

म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे, उदद्योगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे.

**महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार**

स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, प्रशिक्षित शिक्षकाची तरतूद करणे, प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे, ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण, राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण, शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल विचार व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण, त्रिभाषा सूत्राचा अवलंब, शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा शिक्षणविषयक ज्ञान व विचार

**स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा :**

पूर्वीच्या काळामध्ये या परिस्थितीत स्त्रियांनी शिक्षण घेणे. म्हणजे अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडली जावी, म्हणून म. फुलेंनी स्त्री-शिक्षण मोहीम सर्वप्रथम हाती घेतली. शिक्षण हे समर्थ स्त्री म्हणून जगण्यासाठी दिले जावे. स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून म. फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आदय शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली आणि स्त्री-शिक्षण मोहमेस सुरुवात केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत - प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच म. फुले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे एका शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण पडणार नाही. या विचारातून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर दिला. प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे - प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास विदयार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर अधिक भर देण्यात आला.



शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते आणि त्यामुळेच महात्मा फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता, सर्वांना शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन, ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुलेंनी योगदान दिले. म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली. अशाप्रकारे म. फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वतःच्या घरदाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे.

**ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या शिक्षणावर भर :** सुशिक्षित राष्ट्र बनविण्यासाठी महात्मा फुले यांनी ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या शिक्षणापासून सुरुवात केली. बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने, त्यांच्या शिक्षणाची महात्मा फुले यांना अधिक काळजी वाटत असे. २ मार्च १८८८ मध्ये महात्मा फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण - आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्यांच्या उद्धारासाठी शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता. शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल - म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे, उदद्योगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे. शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय दयावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच'शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे'

जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. २१व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षणतज्ज्ञांचे आजच्याशिक्षणातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणा-या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्गदर्शनपर आहेत. शिक्षण आणि अभ्यासक्रमामध्ये जे विचार आहेत. ते याच थोरांचे आहेत. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे महात्मा फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणावे, यावर भर देण्यात आला. **क्रमशः**

संशोधक विद्यार्थी
**भारत आसाराम बल्हाळ**
एम. ए. मराठी, पीएच. डी. अपीयर
(रिसर्च सेंटर – अंकुशराव टोपे कॉलेज जालना)

# कर्नाटकला महाराष्ट्राचे 40 गाव कसे काय आठवले ?



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**भारत देश एक आहे आणि राहील यात दुमत नाही. परंतु देशातील राज्यात सीमा वाद हा तमाशा कशाला हवा? कारण आपल्या पुर्वजांनी भारत स्वातंत्र्यासाठी 150 वर्षे इंग्रजांशी लढा दिला.त्यानंतर भारत स्वतंत्र झाला.तरीही गोव्या सारख्या केंद्र शासीत प्रदेश पोर्तुगीजांच्या ताब्यात होता.गोवा ताब्यात घेण्यासाठी स्वातंत्र्यानंतर तब्बल 14 वर्षे लागली व 19 डिसेंबर1961 ला पोर्तुगीजांपासुन गोवा मुक्त झाला.अशाप्रकारे भारतात एक-एक राज्य सहभागी करण्यासाठी देशाला मेहनत घ्यावी लागली आणि आता फक्त राजकारणापोटी महाराष्ट्रा-कर्नाटक सिमा विवाद सुरू आहे.**

या विवादामध्ये काहीही तथ्य नाही. परंतु राजकीय पुढारी व पक्ष आपले राजकारण टिकवून ठेवण्यासाठी सिमा विवादचा ढिंढोरा सर्वसामान्यांसमोर मांडतांना दिसतात. प्रत्येक राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत यात बेरोजगारी, शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य, उद्योग अशा गोष्टींवर लक्ष देवून ते तत्परतेने सोडविले पाहिजेत जेणेकरून राज्यातील जनतेला समाधान मिळेल व विकास होईल. महाराष्ट्राने आजवर बेळगावसह इतर भाग मिळावेत यासाठी महाराष्ट्राने न्यायालयीन लढा दिला आणि सुरू सुध्दा आहे. परंतु कर्नाटकातील कोणताही भाग महाराष्ट्राला मिळाला नाही आणि मिळणार सुध्दा नाही. कारण हे सर्व नाटक राजकीय पुढारी सर्वसामान्यांची दिशाभूल करण्यासाठी करीत असतात. राज्याचा सिमावाद किंवा कर्नाटकचा महाराष्ट्रातील 40 गावांनवरील दावा हा पुर्णपणे राजकीय प्रेरीत असल्याचे दिसून येते आणि ह्या सर्व घटना देशातील इतर राज्यांतील निवडणुका पाहून हा प्रश्न कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई मुद्दाम उपस्थित करीत असल्याचे वाटते. कर्नाटक-महाराष्ट्र सिमा विवाद म्हणजे भारत-पाकिस्तान विवाद नाही ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्याच्या भागाचा विकास करावा यातच खरी मानुसकी दिसून येईल. त्याचप्रमाणे दोन्ही राज्यांतील राजकीय पुढाऱ्यांनी आप-आपले गाव दत्तक घ्यावे व त्याचा विकास करावा. कर्नाटक व महाराष्ट्र सरकारने सिमा विवादाला जास्त चालना देवून दोन्ही राज्यांच्या नागरिकांच्या भावना दुखावु नये किंवा भडकवु नये. राज्यात सध्याच्या परिस्थितीत फक्त



खोक्याचे राजकारण दिसून येते. त्यामुळे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना महाराष्ट्राकडुन 40 खोके तर पाहिजे तर नाही ना? अशी शंका निर्माण होत आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात विकासापेक्षा खोक्याचेच राजकारण सुरू आहे. त्यामुळे माझ्या मते देशातील कोणत्याही राज्याचा सीमा विवाद नकोच असेल तर तो सामंजस्याने सोडवीला पाहिजे यात राजकारण नको. देशातील प्रत्येक व्यक्ती भारत भ्रमण करतो अशा परिस्थितीत तो व्यक्ती प्रत्येक राज्यात व गावात जातो आणि त्याला प्रत्येक राज्यात मानसन्मान सुध्दा मिळतो मग कशाला हवा सीमा विवाद? त्यामुळे महाराष्ट्र व कर्नाटक सरकारला विनंती आहे की दोन्ही राज्यांनी सीमा विवादाकडे लक्ष न देता राज्याच्या व राज्यातील जनतेच्या विकासाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले तर बरे होईल. कारण यातच सर्वांची भलाई आहे.

# "मानवी भावनांचे मर्म शिकवणारी प्राजक्तची शाळा"

आधुनिक केसरी

**चूल आणि मूल या परिघातून स्त्रिया आता सर्वसामान्यपणे बाहेर पडल्या आहेत हे आपण केवळ शहरातच नव्हे तर अगदी लहान लहान खेड्यातूनही पाहतो आहोत, अनुभवतो आहोत. स्वत्वाची जाणीव असण्याचा, स्वतंत्र, स्वयंसिद्ध असण्याचा तिचा हक्क सर्वसाधारणपणे आता तिला मिळायला लागला आहे असं आपण म्हणू शकतो. अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे. स्त्रीभृण हत्या, स्त्रियांवरचे होणारे अत्याचार याचं प्रमाण कमी झालंय असं म्हणता येत नाही हेही तितकंच खरं. पण मुलीचाही सर्वांगीण विकास होण्याची आवश्यकता आहे याची जाणीव आता घराघरातून व्हायला सुरवात झाली आहे असं आपण निश्चितच म्हणू शकतो.**

मात्र या स्वयंसिद्ध, स्वतंत्र होण्याचे फायदे जसे स्त्रीला मिळू लागले आहेत तशा सर्व बाजूंनी अंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्याची अपरिहार्यताही तिला स्वीकारावी लागतं आहे. मोठ्या संख्येने स्त्रिया चाकरमान्या झाल्या आहेत पण त्यांच्यावरची चूल, मूल, आणि घर ही जबाबदारी अगदी पूर्वीपासून होती तशीच आहे असंच दिसून येतं. पण मी कुठेच कमी पडत नाहीये हे सिद्ध करणारी आजची प्रत्येक स्त्री ही खरोखर जीवनाच्या संघर्षातली वीरांगिनी ठरत आहे.

त्यातूनही कस्तुरीसारखी एखादी स्त्री या संघर्षाला पुरून उरत, लेखिका, समीक्षक, कवयित्री अशा अनेक अंगानी स्वतःचा समर्थ ठसा समाजावर उमटवत असेल तर तिला रणरागिणीशिवाय आणखीन कोणती उपमा देता येईल. तिच्या अनेकानेक पुस्तकांतून, लेखातून, फेसबुक पोस्ट्स मधून, सोशल मीडीयातून तिने आपला वेगळेपणा, आपलं कर्तृत्व सिद्ध केलं आहे. स्वतःच्या व्यक्तिगत जीवनसंघर्षातूनही प्रेरणाच घेण्याचा दुर्दम्य आशावाद तिच्या ठायी मला नेहमी दिसून येतो. तिच्या 'प्राजक्तची शाळा' या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहावी असा प्रस्ताव तिने माझ्यापुढे मांडला. मी वयाने मोठी असले तरी माझी वाङमयीन कारकीर्द अजून प्राथमिक शाळेतच धडे गीरवतीय असं सांगण्याचा मी तिला प्रयत्न केला. पण तिच्या आग्रहाखातर ही प्रस्तावना लिहिण्याचा मान मला मिळाला आहे. अतिशय साध्या शब्दातून, साध्या प्रसंगातून तुमच्या आमच्या मनातले प्रश्न, समाजातल्या समस्या मांडण्याचा असा कुठलाही अभिनिवेश न दाखवता अतिशय हळुवारपणे आणि सकारात्मकतेने हे प्रश्न, या समस्या मांडणारी, अशी कस्तुरीची भाषाशैली आहे.

या कथा संग्रहातली 'पुढचं पाऊल' ही कथा ग्रामीण भागातल्या रूढीप्रेमी शेतकरी कुटुंबातल्या पुरुषप्रधानतेमुळे मुलींची, स्त्रियांची होणारी कुचंबणा ही समस्या अगदी समर्थपणे मांडणारीच आहे. पण एखादा प्रसंग समोरच्या व्यक्तीला सहज सांगावा, मैत्रिणीशी, मित्राशी हितगुज करावं अशा भाषाशैलीत लेखिकेने, खूप शिकून कलेक्टर होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या, हुशार सुंदर नमिताची गोष्ट सांगितली आहे. त्यात कुठलाही आक्रस्ताळेपणा नाही. समाज बदलतोय हा आशावाद आहे. खेड्यातही सुधारणांचा वारा गावातल्या मोकळ्या रानवाऱ्याबरोबर हातात हात घालून वाहतोय, समस्या सुटत आहेत ही सकारात्मकता या संग्रहातल्या अनेक कथांमध्ये दिसून येते. स्त्रीभृणहत्या, विवाहबाह्य संबंध, तळागाळात पसरलेली भ्रष्टाचाराची कीड या समाजाला भेडसावणाऱ्या साऱ्या समस्येंवर कस्तुरीची कथा भाष्य करते. पण अत्यंत संयमाने. चोहीकडून खालावलेल्या नीतिमत्तेचा रेटा आणि डिजिटल माध्यमांमुळे घराच्या दारापर्यंतच नव्हे तर घराघरात, व्यक्तिव्यक्तित आणि मनामनात शिरलेला नीतीअनितीचा संभ्रम या साऱ्यावर मात करीत चांगुलपणा, विवेक अजून टिकून आहे यावर लेखिकेचा दृढ विश्वास आहे.



'स्वप्न कळीचे' मधली मधुरा आणि मयुरेश किंवा 'अनपेक्षित' मधली निशा आणि निशांत यांच्या कथा हा विश्वास सार्थ करतात.

समाजाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड अशीच लेखिकेला अस्वस्थ करून जाते.

श्रेयस आणि प्रेयस यामध्ये असं सांगतात की प्रथमतः अत्यंत आवडणारी, प्रिय वाटणारी मात्र अंतिमतः विनाशाला कारणीभूत होणारी गोष्ट म्हणजे प्रेयस आणि प्रथमतः प्रिय न वाटणारी पण ज्याचा अंतिम परिणाम अत्यंत चांगला, हितकारक असतो ती गोष्ट म्हणजे श्रेयस. माणसाचं मन मात्र नेहमीच प्रेयसकडे धावणारं असतं. जिभेचे चोचले पुरवणाऱ्या पदार्थांना आपली पहिली पसंती असते जे अंतिमतः हानिकारक असतात. आहार विहाराच्या रोजच्या चांगल्या सवयी आपल्याला त्रासदायक वाटतात. रोज लवकर उठायचं, रोज ब्यायाम करायचा याचा कंटाळा येतो. आजारी पडलं की औषधाची एक गोळी पाण्याबरोबर घेऊन टाकण हे त्यापेक्षा किती सोप काम आहे. प्रामाणिक पणाने, धोपटमार्गाने कष्ट करून मिळविलेला पैसा कितीही हितकारक असला तरी भ्रष्टाचाराने, वाम मार्गाने, कमी त्रासात जो अफाट धनसंचय करता येतो त्याचा मोह म्हणूनच माणसाला टाळता येत नाही. 'उपरती' या कथेतील सत्यवान याला अपवाद नाही. ही कथा लिहितानाही 'साधी मांडणी' हे कथेचे सूत्र लेखिकेने सांभाळले आहे. सर्वसामान्यपणे काय घडेल ती वस्तुस्थिती कथन करणारे प्रसंगचं मांडले आहेत. उगाच ओढून ताणून मोठा आदर्शवाद मांडण्याचा सोस नाही किंवा भयानक वास्तवाच्या खोल गर्तेत वाचकाला नेऊन आदळण्याचा अट्टाहास नाही. सर्वसामान्यपणे एखाद्याच्या कुटुंबातही असंच घडेल की बायको नाईलाजाने किंवा अपरिहार्यपणे नवऱ्याला साथच देईल किंवा मित्रही उपदेश करण्याचा फक्त प्रयत्नच करेल.

सत्यवानाला उपरती झाली ती अत्यंत प्रिय अशा मुलांनी त्याला भ्रष्टाचारी म्हटलं तेव्हा. इथेही लेखिकेचा, माणसाच्या आतल्या आवाजावरचा, सद्सद्विवेकबुद्धीवरचा विश्वास दिसून येतो. पापाचं परिमार्जन पश्चात्तापाने होतं हा भाबडा का असेना पण आशावाद कथेचा शेवट करतो. प्राजक्ताची शाळा ही यातली शीर्षक कथा. ग्रामीण भागातल्या अनिष्ट रूढी आणि परंपरांना बळी पडलेल्या यमुनाई आणि मीराची. मीरा आणि केशवच्या सफल न होऊ शकलेल्या अस्फुट प्रेमाची. जोगाई होऊन देवाशी लग्न लागलेल्या आणि गावातल्या वासनांध लोकांच्या वासनांना बळी पडून नशिबी आलेले भोग अपरिहार्यपणे भोगणाऱ्या यमुनाईने लाडकी लेक मीरा हिच्यासाठी सुनंदा या तिच्या शाळेतल्या शिक्षिकेच्या डोळ्यातून चांगल्या आयुष्याचे स्वप्न पाहिले. असफल प्रेम, पुरे न झालेलं स्वप्न. पण या साऱ्याची मांडणी अत्यंत संवेदनशीलतेने करताना लेखिकेच्या लेखणीने कधी विफलतावाद मांडला नाही. समस्या कितीही मोठी असो ती सुटू शकते, त्यावर काहीतरी तोडगा निघू शकतो हा आशावाद या संग्रहातल्या अनेक कथातून समोर येतो. आणि मला वाटत तो आताच्या परिस्थितीत अत्यंत महत्वाचा आहे. कथेच्या मांडणीच्या गरजेनुसार ग्रामीण बोलीतले सहज संवाद, प्रसंगातील भावना व्यक्त करण्यासाठी संवादांना, प्रसंगांना सुसंगत अशा अत्यंत सुंदर, हळव्या अशा कवितांच्या ओळींची पेरणी यामुळे कथेतील भावना मनाला स्पर्श करून जाते.

***"एकांताची घट्ट मिठी***
***सये तुझी प्रीत सोबती***
***सांजवेळ समीप येता***
***बहरून येई अपुली प्रीती***

अशी निशा आणि निशांतच्या प्रेमकहाणीची आठवण उलगडून सांगणारी कविता किंवा अर्णव अंजलीची मूक प्रेमभावना व्यक्त करणारी ही नितांतसुंदर कविता

***नभी तारकांना उजाळा मिळाला***
***स्वप्न तू सख्या रे तराणा मिळाला***
***रित्या ओंजळीला सहारा मिळाला***
***तुझ्या सोबतीचा किनारा मिळाला***

अशा कवितांनी या कथांना एक जिवंत रसरशीतपणा प्राप्त करून दिलेला आहे. मानवी जीवनातले विविध भाव, विविध रंग उलगडून दाखविणारा कस्तुरीचा हा कथासंग्रह मराठी कथाविश्व समृद्ध करणारा आहे यात काहीच शंका नाही. रसिक वाचक या संग्रहाचे मनापासून स्वागत करतील याची खातरी आहे.

**-सरिता कमळापूरकर, पुणे**
**(ज्येष्ठ साहित्यिका, गायिका, निवृत्त शासकीय कर्मचारी)**

# सुखाचा शोध आपल्या जवळच !

आधुनिक केसरी

आज जो तो माणुस सुखासाठी धडपडत आहे. प्रत्येकाला वाटत असते की आपण सुखी असावे.माणसांच जिवन हे सुख दुःखाने भरलेलं आहे. प्रत्येकाला सुख दुःखाचा सामना करावा लागतोच. आयुष्यात सुख मिळाले तर हुरळुन जावू नये.दुःख झाले तर दुःखाने देखिल व्यथित होऊ नये. कोणतीही गोष्ट असु द्या आनंदाने केली पाहिजे. त्यातच खरे सुख आहे.

प्रत्येक माणुस अपेक्षांचे ओझे घेऊन जगत असतो.कुणाला घर घ्यायचेय, कुणाला बंगला बांधायचाय,कुणाला प्रदेशात जायचेय, कोणाला नोकरी पाहिजे,कुणाला पगार जास्त पाहीजेत. कुणाला आरोग्य पाहिजे.कुणाला प्रसिद्धी पाहीजे,अशा अनेक माणसांच्या गरजा आहेत प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. अपेक्षा ह्या जरूर ठेवाव्यात . अपेक्षा असणे गैर नाही.मात्र ह्या सर्व गोष्टींचा विचार करत असताना माणुस आपलं सुख हरवुन बसला आहे.सगळ्यांच्या गरजा पुर्ण होतीलच असे नाही.परंतु माणुस आज समाधानी,सुखी आहे का याचा वीचार करणे गरजेचे आहे.

माणसाने मनाने समाधानी असणे गरजेचे आहे गरजा काय कधीही पुर्ण हैऊ शकतील पण सुख कशात आहे हे पाहीले पाहिजे.ह्या जगात सुख कोणाला नको आहे.जो तो सुखासाठी धरपडतो आहे .ॲरिस्टॉटल सांगतात सुख म्हणजे सद्गुणांना अनुसरुन केलेली कृती होय.माणसाच्या आयुष्यात अनेक चढउतार येत असतात.कवीवर्य ग .दी.माडगुळकर यांच्या शब्दांत जर सांगायचे झाले तर एक धागा सुखाचा ,शंभर धागे दुःखाचे हे लक्षात घेतले पाहिजे.आयुष्यात जी माणसं दुःख भोगतात एक ना एक दिवस त्यांना सुख नक्कीच प्राप्त होत असते. यात काही शंका नाही आयुष्यात समाधानी असण्याची खरे सुख आहे.सुख हे आपल्याजवळच आहे. प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असु शकतात. सुख म्हणजे काय तर मनाला मिळणारा आनंद होत. आज आपल्याला निसर्गाने इतकं भरभरून दिलंय त्याची किंमत आपण करू शकत नाही. आपल्याला निसर्गच खुप काही सांगुन जाते असतो. सुंदर वृक्ष ,फुले ,वाहते नदीचे पाणी बघा कसे वाहत असते. पक्षी बघा ना घर दार मुक्त संचार करतात परंतु त्यांना निसर्गाने भरभरून दिलंय आपल्याला निसर्गाने भरभरून दीलयं ही सुंदर हवा ज्यामुळे आपण श्वास घेतोय . कारण हे आपल्याला फुकटात मिळालेय म्हणून त्याची किंमत नाही खरा सुखाचा झरा आपल्याला आपल्याजवळच सापडेल परंतु तो ओळखता आला पाहिजे.जो माणुस आज समाधानी आहे तो माणुस खर्या अर्थाने समाधानी,सुखी आहे.समाधानासारखे कोणतेच सुख नाही.जो माणुस रोषाला बळी पडतो. तो आयुष्यात कधीच सुखी राहत नाही. ज्यांना दुःखाची जाणीव आहे. त्यांनाच सुखाची खरी किंमत कळते. माणसाने विचाराने श्रीमंत, मनाने समाधानी असले पाहिजे. तीच माणसे जिवनात सुखी होतात.

आज बर्याच माणसांना वाटत असते की श्रीमंत माणसे सुखी आहेत. पण तसे नाही सुख दुःख हे सर्वांना सारखेच असते.गरीब असो वा श्रीमंत सगळ्यांनाच सुख दुःखाला सामोरे जावे लागते.आज श्रीमंताकडे अमाप पैसा ,गाडी बंगला सर्व काही आहे पण समाधानच नाही तर त्या पैशाचा काय उपयोग जर सुख हे विकत मिळाले असते जगातली सर्वच माणसे सुखी झाली असती.असे काही नाही झोपडीत राहणारा माणुससुद्धा सुखी समाधानी असु शकतो. कारण सुख हे आपल्या मानण्यावर आहे. जो माणुस निरोगी, ज्याला शांत झोप लागते तो माणुस खरा सुखी आहे. असे काही लोक आहेत त्यांना शांत झोप लागत नाही.सुख दुःखाची जाणीव माणसाला असली पाहिजे.सुख पाहता जवाएवढे दुःख पर्वताएवढे अभंगानुसार सिमित आणि दुःख अमर्याद आहे. सुखामागुन दुःख परत सुख ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख दुःख हे येत असतात.पेला अर्धाच भरलाय म्हणण्यापेक्षा अर्धा तरी भरलाय ना ही भावना त्यामागची आहे. आज समाजात माणसाला दुसर्यांचं सुख पहावले जात नाही. त्यामुळे माणसाने कितीही प्रगती केली तरी त्याला आपल्या सुखाचा आनंद घेता येत नाही.कधी कधी माणुस आयुष्यभर सुखासाठी धरपडतो.पण सुख मिळाल्यानंतर असं वाटतं अरेच्चा आपण उगीच यासाठी धरपडत होतो.उगाच आपण अट्टाहास करत होतो. सुख कधी कोणाच्या रूपात येईल हे सांगता येत नाही. आपण सुखाला ओळखले पाहिजे. उगाच, चिंता,काळजी,खोट्या प्रतिष्ठेच्या मागे लागु नका. समाधानी रहा.नाहक अपेक्षा ठेवु नका. अपेक्षा कधीच संपणार नाही. साधेपणाने राहण्यातच खरे सुख आहे.सुंदर चेहरा म्हातारा होतो. बलाढ्य शरीर सुद्धा एक दिवस गळून पडते ,पदसुद्धा निघुन जाते.मग एवढी धडपड कशासाठी, त्यासाठी जिवनात समाधानी राहण्यासाठी सुखाचा शोध घेतला पाहिजे तो आपल्याजवळच आहे परंतु त्याला ओळखता आलं पाहिजे. जगात सुंदर काय असेल तर ते आपलं मन, आपला दृष्टिकोन,आपलं वागणं त्यासाठी कुणाचे वाईट करायचं नाही. कुणांच वाईट चिंतायचं नाही, फक्त स्वतः शी प्रमाणिक राहायचे. आज सुख प्रत्येकाकडे आहे. फक्त ते शोधता आले पाहिजे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

# निव्वळंच नालायक समजूलाले राव तुम्ही कविला !

आधुनिक केसरी

**'तो कविता लिहितो' म्हणजे 'विचार करतो' हे नाही का महत्वाचं त्यानं लांड्या-लबाड्या, कुटाने, कारस्थानं, काचकं-कुचकं अजून कांही करण्यापेक्षा ? तो म्हणतो 'हे चुकतंय बरं का !' म्हणजे त्याला कळतंय. कळायलंय. कळंत असलं पाहिजे, 'बरोबर कसं असतं', हे नाही का महत्वाचं ? तो म्हणतो, 'ते सुंदरय !' म्हणजे कुरुपाचं रूप त्याला माहितंय. तुलना करतोय तो. वाईट करतोय का तो कांही ?**

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : 4



तो म्हणतो, 'हे असं होतं', 'आज असं आहे', 'उद्या असं असेल' म्हणजे नाही का त्याच्या म्हणण्यात कांहीच तथ्य ? निव्वळच बाश्कळ बडबडतोय का तो ? त्याच्या कानावर येतात चार गोष्टी, नजरेसही पडतात, तो बघतो ना स्वतःसुद्धा, लोकही दाखवतात, सांगतात ना, तो ऐकून घेतो सगळ्यांचंच, सुसंगती लागते का बघतो सगळ्याच घटकांची, घटनांशी. लख्ख उजेड पडतो डोक्यात, तेंव्हा उमटतं कागदावर. सांगू, बोलू, लिहू, चिंतनू नये का त्यानं ? 'कारण-कारक भाव लक्षात येतो त्याच्या' हे नाही का महत्वाचं ? कवीची मुस्कटदाबी करुन भवताल मारुन टाकणार आहात का तुम्ही ? कोळ्याचा वाल्या नसता तर जिता राहिला असता का राम ? व्यास नसता तर कळला असता का कृष्ण ? कळनारे लोक काळकोठडीत डांबून, गोळ्या झाडून, अपमानीत करुन कुणाचं वाटोळं करतोय गा ? महात्मा मारून टाकला ना नथूरांनं, सगळं बाड बुडवलं इंद्रायनीत तुकोबाचं, मंबाजीनं किती छळलं द्न्यानेश्वराला, त्याच्या ननग्या भावंडांना,फुल्यांच्या परीवाराची किती केली परवड, फायली वरुन टाकल्या, अलमोस्ट फेकल्याच की बाबासाहेबांच्या टेबलावर, हा अपमान नव्हता का प्रद्नेचा ?
अनुल्लेखानंच अवमानीत केली अन्नाभाऊंची प्रतिभा, वामनदादा नसता तर कळला असता का रे भीमराव गावकुसाला ? सकाळी सकाळी उडवले ना दाभोळकर भर रस्त्यात, पुण्यात, पानसरेंच्या मारेक-यांचा पत्ता सापडंत असतो का?
'हे काय चाललंय आपल्या भवतालात ?' म्हणाला कवी, तर चूक करतोय का ? जरुर गरीब असतील, अगदीच निर्धन कवीलोक, म्हणून काय मारुन टाकायची संवेदनेला लगडून आलेली दुःखंच सगळी कवीनं ? कवी स्वाभीमानाची भाषा करतो, चूक करतो का ? त्याच्या वाढलेल्या दाढीची चेष्ठा करुन, त्याच्या फाटक्या चपलेची टर उडवून, त्याच्या शबनमला थट्टेचा विषय करुन काय मिळवतोय गा आपण ? त्याच्या खाण्यापिण्यावर किती शेलके विनोद करंत बसनार ? 'केवळ साधन नाही कविता मन रमवण्याचं, मूल्य रुजवण्याचंही माध्यम आहे', हे नाही का माहित कवीला ? सांगावं वाटणं, या नैसर्गीक गरजेचा करु नये वापर त्यानं ? आणि जर का असेलच त्याचं म्हणणं समाजरचनेत अमुलाग्र बदल करु पाहणारं तर ते ऐकूनही घ्यायचं नाही का ? तो दुराग्रही आग्रह धरंत असेल तर देता येईल समज, दिशा बदलून विचार करायला सांगता येवू शकेल. 'समाज रसातळाला चाललाय', 'माणूसकी हरवत चाललीय' 'आपण जबाबदारांनी हलवायला हवीत हात-पाय', 'इतिहासाच्या जिवावर कुठवर मारायच्या उड्या ? पोटं भरण्याचं साधन म्हणून इतिहास वापरणा-यांकडून ठेवता येईल नव्या वैभवशाली इतिहासाचं नवनिर्माण ? ऐतखावू यंत्रणांचे संदर्भ देवून भिरकावत असेल तक्रार तर कांही वाईट करतोय का कवी ? काय म्हणालात, 'त्याला बोलण्याचा हक्क कुणी दिला?' माहितीच्या अधिकारात पुसताय का तुम्ही हे मला ? जन्मासोबत वाणी आली, बापानं हातात, पाटी पेन्शील दिली, त्यानं विकसीत केली लिहायला, बोलायला. आज ताला-सुरात बोलतोय.वाईत करतोय का तो ? कवीच्या बोलण्याला 'ही त्याची नेहमीचीच वटवट' म्हणून नजरंदाज करंत राहिलोत आपण तर गंभीर परिनामांचं तोंड पहावं लागेल आपल्याला. त्याच्या उनिवांवर बोट ठेवन्यामागं बदनाचीचा हेतू नसतो गा. त्यानं सत् प्रवृत्तीवर फुलं उधळली, पाप केलं का ? 'उतरलेलं वरण नको टाकू गोर-गरीब लेकरांच्या ताटात' म्हणाला कनी, काय वाईट सांगीतलं का रे त्याच्या माय-बहीनीला ? 'तुमचे जुणे-पाणे कापडं द्या म्हणाला थंडीत कुडकुडंत बसलेल्या गरीबीला', काय वाईट सुचवलं का रे त्यानं ? तो महापुरुषांच्या दिशानिर्देशानुसार जगण्याचं समर्थन करतो तो, माझ्या लेखी कांही पाप करंत नाही तो. कवी भाट नाही व्यवस्थेचा, मालक म्हणेल तशी वळणं घ्यायला. मानासन्मानाचे अमिषं दावून तुम्ही नाहीत टाकू शकंत खिशात. मी जिवंत आहे अजून...
सांगा कुठली दावन धरली होती, महाकवी सुधाकर गायधनीनं, ग्रेसानं, सुरेश भटांनी ? आहे कुठल्या आगपाकड्या अहंकारी गटातटात डॉ यशवंत मनोहरांचं नाव ? राजकीय मोहाला बळी पडलेल्या चार पिदुकड्यांवरुन मोजनार का तुम्ही प्रतिभेची उंची ? चार सुमार दर्जाचे लाळघोटू कुठल्या क्षेत्रात नाही ? त्यावरुन ठरवणार का तुम्ही अख्ख्या कविकुळाची औकात ? आणि हो, तुमची कुणी मोजीयची उंची ? आहे खोली तुम्हाला ?

निव्वळच नालायक समजूलाले राव तुम्ही कवीला... करा ही सगळी भक्तीगीतं, भावगीतं, आरत्या, ओव्या, अभंगं, गवळणी, भारुडं, गजला, सिनेगीतं कव्वाल्या, पोवाडे, भीमगीतं असे सगळे सगळे कवितेचे धागेदोरे धरुन उभे केलेले सगळे धार्मिक, उत्सवं, पुस्तकं बंद.एक दिवस जगू शकणार नाहीत राव. नाच रद्द करुन बघा बरं जरा, गाबरं उभा फुकून देतील उत्सव. कुठल्या भ्रमात वावरुलाले राजेहो ! ध्यानात ठेवा ! कवी नेस्तनाबूत करणा-या मातीचा मसनवाटा व्हायला वेळ लागंत नाही. जी माती विचारवंतांना मोजंत नाही, तिचं मातरं होणं, कसं रोखनार कुणी तरी ? निव्वळ दुधखुळा नाही तो... त्याला 'कळतं', हे नाही का कॉलिफीकेशन त्याचं ?
'आपला वाली नाही कुणी' म्हणून बोंबा मारता राव, काय घेता याचा अर्थ ?
**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आहेत आणि इंग्रजी भाषेचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

# वेद ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मितच!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**_क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची इतर नावे महात्मा फुले, ज्योतिबा फुले, आबा, राष्ट्रपितामह, तात्यासाहेब, शिक्षणसम्राट आदी आहेत. ते मराठी लेखक, कवी, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी, कामगार, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची पेरणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर त्यांचे ऋणनिर्देश करणारा अलककार- श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे यांचा हा लेख अभ्यासा.**

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे. शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र- ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत- **"विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"**

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना सेंद्रिय बुद्धिवंत असे संबोधले आहे. जोतिराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. पुढे महात्मा फुलेजींनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी तद्वतच अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केली. त्यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण- सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढली. तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी- क्रांतिज्योती सावित्रीमाईंवर सोपविली. त्यांच्या सोबतीला ज्ञानज्योती फातिमाबी शेख सावलीसारख्या होत्या.



यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतिबांकडून रोज संतश्रेष्ठ कबीरांचा बीजमती हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे त्यांच्या मनावर संत विचारांची शिकवण चांगलीच बिंबली. अनेक दोहे त्यांना पाठ झाले. त्यातील एक-

**"नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध! तुम कैसे बम्मन, हम कैसे क्षूद!!"**

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे रोखठोकपणे बोलत. मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी गुप्तशक्ती आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे, हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी आदी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे-

"धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्यानें वर्तावें। ईशासाठीं।। सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों। मनुजा सांगतो। जोती म्हणें।। (महात्मा फुले समग्र वाङ्मयः सार्वजनिक सत्य धर्म पुस्तकः अखंड- पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या. छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून-

"देवाचे नियमां प्रमाण धरुनी, चालें तुझें कूळ गे।। सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे।। अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी।। प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी।। .... शुभमंगल सावधान।।१।।" (महात्मा फुले समग्र वाङ्मयः सत्यशोधक समाजोक्त पूजा-विधीः मंगळाष्टक- वरः पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर- "सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती॥" हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीरावजी फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच!

# कृष्णदेवराय : यशोगाथा चक्रवर्ती राजाची




प्रा.बी.एन.चौधरी
मो. ९४२३४९२५९३

आधुनिक केसरी

**विजयनगर साम्राज्याचा अस्त खर्या अर्थाने इ.स. १६४६ साली झाला आणि त्याच सुमारास ज्यांचे नांव स्मरताच आम्हा मराठी माणसाच्या अंगावर मूठभर मांस चढते असा शूर शिवाजी नांवाचा एक तेजस्वी युवक हिंदवी स्वराज्याची विजयपताका फडकवत ठेवण्यासाठी महाराष्ट्रांत उदयास येत होता. तो निव्वळ योगायोग होता असे म्हणता येणार नाही. हिंदवी स्वराज्याची पताका निरंतर फडकत राहावी अशी बहुधा नियतीचीच इच्छा असावी.**

शिवाजी महाराज इ.स. १६४०-४२ दरम्यान कर्नाटकात बेंगलूरू येथे राहिले होते. विजयनगर साम्राज्याने मुस्लिम शासकांचा निकराने प्रतिकार करीत जवळपास तीनशे वर्षे एक हिंदू राष्ट्र टिकवून ठेवले होते. संवेदनशील अशा शिवाजी राजांनी तिथला इतिहास समजून घेतला नसेल असे म्हणता येणार नाही. साहिती-समरांगण-सार्वभौम कृष्णराय समरांगणात अजिंक्य योद्धे तर होतेच शिवाय एक साहित्यिक व प्रजाहितदक्ष शासक म्हणून त्याच्या कार्य कर्तृत्वाच्या कहाण्या ऐकून शिवाजी राजे नक्कीच प्रभावित झाले असतील. किंबहुना एका शतकांपूर्वी अस्त पावलेले हिंदवी स्वराज्याचे वैभव परत आणण्याचे सोनेरी स्वप्न शिवरायांनी कर्नाटक मुक्कामी असतानाच पाहिले असावे. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे नुकतीच वाचनात आलेली, कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रकाशित केलेली "राजाधिराज श्रीकृष्णदेवराय" ही प्रदीर्घ कादंबरी. या कादंबरीच्या माध्यमातून श्रीकृष्णदेवरायांचे समग्र चरित्र उभे करीत असताना त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि एका राज्यकर्त्याच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे मनभावन नाट्य उभे केले आहे. कृष्णदेवरायांमधील एक प्रजाहितदक्ष राजा, युद्धशास्त्र निपुण, विवेकी सेनानायक, मुत्सद्दी राजकारणी, प्रतिभावंत साहित्यिक, साहित्य, कलांचं मोल जाणणारा आणि त्यांना राजाश्रय देणारा गुणग्राहक राजा, असे विविध पैलू समर्थपणे उलगडून दाखविले आहेत. ही कादंबरी, एका हिंदू चक्रवर्ती राजाला, प्रांत-भाषेच्या बेडीतून मुक्त करणारी आहे. ऐतिहासिक तथ्यांना दंतकथांचा जोड देत लेखक कल्पनाशक्तीचे पंख लावून एका साहित्यकृतीला किती सुंदरपणे खुलवू शकतो, रंजक करु शकतो हे ह्या कादंबरीतून सतत जाणवत राहते. कथानक जिवंत झाल्याने वाचकाला इतिहासात डोकावण्याची एक नवी दृष्टी प्राप्त होते. आपण प्रत्यक्ष इतिहासात वावरत आहोत, साक्षात इतिहासाचं चलचित्रपट बघत आहोत असा भास होतो, हे लेखकाचे खरे यश आहे. बहुतेक वेळा चरित्र, कादंबरी लिहिताना लेखक चरित्र नायकाच्या प्रेमातच पडलेला असतो. आपुलकी, स्नेह आणि प्रेम ह्यामुळे चरित्रनायकाचा अनुचित गौरव करण्याचा मोह पडू शकतो. परंतु इथे श्रीकृष्णदेवरायांचे व्यक्तिमत्व उभे करताना, त्यांच्यातील गुणविशेष नोंदविताना, एक मर्त्य मानव म्हणून असलेल्या त्यांच्या मर्यादा, दोषांनाही तेवढ्याच समर्थपणे मांडल्या आहेत. यातून एक साक्षेपी आणि सव्यसाची लेखकाचा प्रत्यय येतो. या अगोदर ह्याच लेखकाने कृष्णदेवराय रचित आमुक्तमाल्यदा ह्या तेलुगु काव्यप्रबंधाचा मराठी आणि हिंदी भाषेत गद्यानुवाद केला आहे. साहिती-समरांगण-सार्वभौम श्रीकृष्णदेवराय हा अभ्यासपूर्ण चरित्रग्रंथ लिहिला आहे. कृष्णदेवराय हा त्यांचा आवडीचा, अभ्यासाचा विषय आहे. किंबहुना त्या अभ्यासामुळेच ऐतिहासिक तथ्ये पक्की झाल्याने 'असे घडले असेल' अशी कल्पना करीत कृष्णरायांच्या जीवनाचे चित्रण तटस्थपणे कथन करता येणे लेखकाला सोपे गेले असावे. संपूर्ण कादंबरीभर सात्त्विकता, पावित्र्य आणि भक्तिभाव ओसंडून वाहताना जाणवतात. भाषेत एक अनामिक गोडवा आणि सौंदर्य अवतरले आहे. लेखक कुठेही वस्तुनिष्ठतेची लक्ष्मण रेषा ओलांडत नाहीत, हेच या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. कादंबरीचा प्रवेशच अतिशय उत्कंठावर्धक आणि वाचकाला गुंतवून टाकणारा झाला आहे. त्यामुळे वाचक कथेत गुंतत जातो. कादंबरीतले हे प्रसंग वाचकाला सजग करतात. ते प्रत्यक्षच वाचायला हवेत. मोठी माणसं जशी मनाने मोठी असतात परंतु त्यांचे पायही मातीचेच असतात, हे तथ्य लेखकाने अतिशय संवेदनशीलतेने, प्रभावीपणे मांडले आहे. तेनाली रामन यांच्या बुद्धीमत्तेची ओळख पटवून देण्यासाठी लेखकाने कुठेही कृष्णरायांना कमीपणा येईल असे दाखविले नाही. यामुळे दोघांबद्दलचा आदर भाव




अधिक दृढ होतो.

कादंबरीतील प्रत्येक प्रसंग, घटना अशा काही शब्दबद्ध केलेल्या आहेत की वाचक त्या काळाचा, कथानकाचा, प्रसंगांचाच एक भाग, घटक होवून समरसून जातो. लेखकाचे प्रसंग खुलवण्याचं कसब आणि लालित्य कौतुकास्पद असून, जणू परकाया प्रवेश करुनच, ते आपणास हा सर्व वृत्तांत कथन करत आहेत असा भास होतो. कृष्णराय यांचे राजे असणे जितके डोळ्यांत भरते तितकेच किंवा त्याहून अधिक त्यांच्यातला हळवा साहित्यिक आणि रसिक, जाणकार अधिक उठून दिसतो. आपल्या कन्येच्या विवाह प्रसंगी रायांनी सांगितलेलं कन्यादानाचं महत्व (२५४), देवस्थानांना दान देतांना सांगितलेला "इदं न मम" चा अर्थ (२६५), कवीच्या पालखीला स्वतः खांदा देवून रायांनी वाढवलेली कवीची प्रतिष्ठा आणि राजाचं मोठेपण (२७६), समीक्षेचे रचनात्मक आणि उपरोधात्मक प्रकार (४४०), कैदेत टाकलेल्या आप्पाजींची स्वामीनिष्ठता-धन्यावरचा विश्वास, प्रेम आणि रायांचं प्रायश्चित्त ((५१०), रायांनी आपला उत्तराधिकारी म्हणून आपले सावत्रबंधूंची केलेली दूरदर्शी निवड (५२१), साहित्यकार आणि शिल्पकार यांच्या कलेतील नेमका भेद स्पष्ट करणारं चिंतन (५२७) हे सारं कथन करायला, मांडायला माझं शब्द सामर्थ्य अपूर्ण आहे याची मला जाण आहे. वाचकांनी स्वतः वाचूनच त्याचा आस्वाद घ्यावा. तृप्तीच्या आनंदात डुबकी घ्यावी, इतकं ते थोर झालेलं आहे. ही या कादंबरीची आणि लेखकाचीही जमेची बाजू आहे. मराठीत ऐतिहासिक कादंबऱ्यांची परंपरा खूप जुनी आणि समृद्ध आहे. ह्या कादंबऱ्यांनी मराठी वाचकांमध्येच नाही तर जगभरातील वाचकांच्या हृदयात स्थान निर्माण केलं आहे. मराठी साहित्यातील मैलाचे दगड ठरले आहेत. त्याच परंपरेत व्यंकटेश देवनपल्ली ह्या लेखकाने सक्षम पदार्पण केले आहे. आपल्या शैलीने आणि लेखन सामर्थ्याने ते आपली स्वतःची ओळख निर्माण करुन, आपलं स्वतः:च अढळ स्थान निर्माण करतील. या बाबत कोणतीही शंका नाही. एक ऐतिहासिक कादंबरी म्हणून "राजाधिराज श्रीकृष्णदेवराय" ह्या ऐतिहासिक कादंबरीला अनुरूप अशी भारदस्त बांधणी, आकर्षक मुखपृष्ठ आणि सुबक मांडणी हवी होती, ती कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने, आपल्या लौकिकाला साजेल अशीच केली आहे.

प्रथमदर्शनीच वाचकाचे लक्ष वेधून घेणारे रायन गौड यांचे अप्रतिम मुखपृष्ठ आहे. उच्चदर्जाचे निर्मितीमूल्य सांभाळल्याने आणि तितकाच समृध्द, लेखन ऐवज असल्याने, कादंबरी रसिकमान्य होईलच. कादंबरीत दिलेली काही रंगीत चित्र कथानकाशी वाचकाचा अनुबंध जुळवून घ्यायला पूरक अशीच आहेत. एक वैभवसंपन्न हिंदुराष्ट्र राज्य घडवण्यासाठी, टिकवून ठेवण्यासाठी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्यच, समिधा म्हणून अर्पण केल्या आहेत. त्यांचे चरित्र मराठी भाषिक वाचकांपर्यत पोहचविण्याचं काम ही कादंबरी भविष्यात करणार आहे. लेखकाने या कादंबरीच्या निमित्ताने एक शिवधनुष्यच लीलया उचलले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

**समिक्षा**

**कादंबरी : राजाधिराज श्रीकृष्णदेवराय.**
**लेखक : व्यंकटेश देवनपल्ली**
**प्रकाशन : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.**
**पृष्ठ : ५५१. मूल्य : ५०० रु**
**समिक्षा : प्रा.बी.एन.चौधरी, धरणगाव.**

# भारतीय तरुणांमध्ये ऑनलाईन गेम्सचे वाढते वेड

आधुनिक केसरी


**भारतात दिवसेंदिवस तरुणाई ऑनलाईन गेममध्ये अडकत चालली असून, ऑनलाईन गेम्सच्या व्यवसायात भारत जगात चौथा देश ठरला आहे. २०२२ मध्ये भारतात १५०० कोटी वेळा गेम्स डाऊनलोड केले आहेत. हे चीन, अमेरिका आणि जपाननंतर जगात सर्वात जास्त प्रमाण आहे. याचे सर्वात मोठे कारण भारतातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या आणि स्वस्त मोबाइल डेटा आहे. गेमिंग कॅपिटल फंड लुमीकाईनुसार भारतात २०२२ मध्ये ऑनलाईन गेम्सचा व्यवसाय सुमारे ८९६७ कोटी रुपयांचा आहे. यावरून भारतातील तरूणाईमध्ये ऑनलाईन गेमचे वेड किती वाढले आहे, याचा अंदाज येतो.**

कोरोना लॉकडाउनच्या काळात सुरक्षित सामाजिक वावराचं बंधन पाळण्यासाठी घरच्या घरी ऑनलाईन गेम्सचा पर्याय स्वीकारलागेला. त्यामुळे ऑनलाईन गेमिंग करणाऱ्यांची संख्या वाढली. घरबसल्या नातेवाईकांबरोबर, मित्र-मैत्रिणींबरोबर ऑनलाइन गेम्सचे डाव मोठ्या प्रमाणावर रंगताना दिसले. मध्यंतरीच्या काळात पबजी या गेमचं वेड वाढल्यामुळे तो खेळण्यावर या गेमच्या कंपनीकडून काही निर्बंध घालून देण्यात आले होते. मात्र ल्युडो, सापशिडी, बुद्धिबळ, पत्ते यांसारख्या ग्रुपनं खेळल्या गेम्सवर कोणतेच निर्बंध नसल्यामुळे हे गेम खेळण्याकडे अनेकांचा ओढा या काळात वाढला होता. ऑनलाईन गेम करमणूक नव्हे तर आता कमाईचे साधन बनले आहे. गेम बनवण्यापासून खेळण्यापर्यंत पैसे मिळत आहेत. २९ वर्षीय सलमान अहमदने गेमर होण्यासाठी गुगलची नोकरी सोडली. गेमर म्हणून तो दरमहा सुमारे १० लाख रु. कमावतो. त्याने चिनी मोबाइल कंपनी रेडमीपासून स्किन केअर कंपनी मामाअर्थपर्यंतच्या ब्रँडशी करार केले आहेत. ई-स्पोर्टसच्या माध्यमातूनही कोट्यवधी रुपये बक्षिसांची रक्कम मिळत असते. २३ वर्षीय सलोनी पवार ही भारतातील पहिली महिला आहे, जिने आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित एखाद्या ई-स्पोर्टस स्पर्धेत भाग घेतला आहे. ही स्पर्धा २०१९ मध्ये थायलंडमध्ये झाली होती. ती म्हणते की, प्रथम कुटुंबाने साथ दिली नव्हती. मात्र, पैसे येत गेल्यावर त्यांना लक्षात आले की, यातही संधी आहे. हैदराबादमध्ये १८ ते २० नोव्हेंबरपर्यंत ८० लाखांच्या बक्षिसांच्या ३ ई-स्पोर्टस स्पर्धा मोबाइलद्वारे हजारोंनी पाहिली होती. खेळ खेळणे आरोग्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे, पण ते मैदानी असावेत. इंटरनेट क्रांती पूर्वी सुर-पारंब्या, लपंडाव, कबड्डी, विटी दांडू, खो-खो अशा प्रकारचे मैदानी खेळ मोठ्या प्रमाणावर खेळले जायचे. आज एका क्लिकवर हजारो ऑनलाईन व्हिडिओ गेम्स सहज उपलब्ध होत आहेत. त्यामुळे आता लहान मुलांपासून तरूणाई सुद्धा या आभासी असणा-या ऑनलाईन गेम्सनाच पसंदी देत असल्याने मैदानी खेळ खेळणे कमी झाले आहे. आजची तरूणाई थोडासाही फावला वेळ मिळाला की, ऑनलाईन



गेम्स खेळताना दिसते. चालताना, हॉटेलमध्ये चहा घेताना, सिग्नल लागले असताना ही तरूणाई सहज गेमची पूढची लेव्हल पार करते. अनेक तरूण एकत्र आल्यानंतर एकमेकांना गप्पा मारण्याऐवजी हातात मोबाईल घेवून ऑनलाईन गेम्स खेळण्यात गुंतलेले दिसतात. ऑनलाईन गेम खेळणे आणि तो जिंकणे, हा या तरूणांसाठी आता प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे. दिवसातला थोडा वेळ गेम खेळणे ठिक आहे. पण गेमिंगच्या सवयींमुळे गंभीर आजार होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत अभ्यास करून एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार एखादी व्यक्ती मोकळ्या वेळेत सतत मोबाईल गेम्स खेळत असेल तर तिला एखादा गंभीर आजार आहे असे समजायला हरकत नाही. त्यांनी ऑनलाईन गेमच्या आजाराबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावरील यादी जाहीर केली आहे. यामध्ये 'घातक गेमिंग' आणि 'गेमिंग डिसऑर्डर' असे दोन प्रकार दिलेत. त्यामुळे जास्त वेळ गेम खेळणं हे आरोग्यासाठी हानिकारक आहे. बहुंतांश ऑनलाईन गेम्स मध्ये हिंसेचे प्रमाण जास्त असल्याने हे गेम्स खेळत, त्यातील मारधाडीच्या टास्क पूर्ण करता-करता तरूणांमध्ये हिंसात्मक भावना वाढत आहे. सोबत सतत ऑनलाईन गेम्स खेळल्यामुळे दृष्टीदोषासारख्या शारीरिक आजारांबरोबर मानसिक आजार जडण्याची शक्यता असते. काही वर्षांपूर्वी ब्लू व्हेल या ऑनलाईन गेमने जगभरात हाहाकार माजवला होता. भारतात या गेमच्या आहारी जाऊन अनेकांनी आपला जीव गमावला होता. तात्पुरती उपाययोजना म्हणून सरकारनं इंटरनेटवरील या गेम्सच्या लिंक हटवण्याचे आदेश दिले, तर तिकडे अमेरिकेत गेम बनवणाऱ्या संचालकाला अटक झाली होती. त्यामुळे परिस्थिती वेळीच नियंत्रणात आली होती. ५ जीचा शुभारंभ भारताच्या ऑनलाइन गेमिंगला मोठा बाजार देईल. २०२६ पर्यंत भारतात १०० कोटी स्मार्टफोन असतील. मार्च २०२७ पर्यंत हा ऑनलाईन गेमींगचा व्यव्हार ३० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल असा अंदाज आहे. त्यामुळे भविष्यात तरुणाई आणि मुलेदेखील या ऑनलाईन गेमिंगमध्ये आणखी जखडून जाण्याचा धोका आहे.

सुरेश मंत्री
अंबाजोगाई
संपर्क : ९४०३६५०७२२



# गौताळा अभयारण्य

आधुनिक केसरी

गौताळा अभयारण्य हे अभयारण्य मराठवाड्यातील सर्वात मोठे अभयारण्य होय. औरंगाबाद शहरापासून 75 कि.मी.अंतरावर, कन्नडपासून 5 कि.मी. अंतरावर तर चाळीसगावपासून 20 कि.मी.अंतरावर आहे. औरंगाबाद आणि धुळे यांना जोडणारा राज्य महामार्ग क्र.211 या अभयारण्यातूनच जातो. कन्नडजवळच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर अनेक प्रकारची झाडे, फुलझाडे दिसतात. पुढे गेल्यानंतर चंदनाच्या वनामधून वाहणारा एक नाला दिसतो त्याला चंदन नाला म्हणतात. याच्या काठाला मोर, पोपट असे रंगीबेरंगी पक्षी दिसतात. त्याचप्रमाणे सातभाई, सुगरण, दयाळ, बुलबुल, कोतवाल आणि चंडोल पक्षी दिसतात. पुढे एक मारुतीचे मंदिर आहे. या मंदिरासमोर गौताळा तलाव आहे. या तलावाचा सारा परिसर गवताळ आहे. याठिकाणी पूर्वी गवळी लोक रहायचे. त्यांच्या गायी या परिसरात चरायच्या. त्यावरून या तलावाला गौताळा हे नाव पडले आणि हेच नाव पुढे अभयारण्यालाही देण्यात आले. गौताळा तळ्याभोवती बांबू, पळस, रानपिंपळ, रानशेवगा, कडूलिंब, चिंच या प्रकारचे वृक्ष आहेत. तळ्यात पाणडुब्या, पाणकोंबडी आणि इतर पक्षी दिसतात. तळ्याशेजारी एक निरीक्षण मनोरा आहे. या मनोऱ्यावरून गौताळा परिसरातील निसर्ग न्याहाळता येतो. गौताळा तलावाच्या डाव्या बाजूला सातमाळ्याचा डोंगर दिसतो. या डोंगरातून नागद नदी उगम पावते. ती उजवीकडच्या भेळदरीत उतरते. तेथे नदीवर नागद तलाव बांधलेला आहे. सातमाळ्याच्या पलीकडे मांजरमाळ डोंगर दिसतो. जंगलातले सर्व पाणवठे उन्हाळ्यात आटतात पण नागद तलाव, गराडा आणि निर्भोर या पाणवठ्यातील पाणी टिकून राहते. वन्यजीव उन्हाळ्यात याठिकाणी तहान भागविण्यासाठी येतात. कसे जाल- अभयारण्यात वाहनाने किंवा पायी फिरता येते. येथे जाण्यासाठी बस, मोटारगाडीने जाण्याची सुविधा आहे.

# वीजपुरवठा खंडित; शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

## चौदा गावांचा फटका; तत्काळ लाईट सुरू करण्याचे आंदोलकांना आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता गंगापूर तालुक्यातील वरखेड उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या चौदा गावाचा वीजपुरवठा वीज वितरण कंपनीने शनिवारी संध्याकाळपासून खंडित केल्यामळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी नेते वाल्मिक शिरसाठ यांनी संतप्त झालेल्या शेतकऱ्यांसह आज सकाळी आकरा वाजेपासून वरखेड उपकेंद्रासमोर ठिय्या आंदोलन सुरू करून जोपर्यंत खंडित केलेला पुरवठा पुन्हा सुरू करीत नाही तोपर्यंत उठणार नाही अशी भूमिका घेतल्यामुळे भंबेरी उडालेल्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ लाईट सुरू करण्याचे आश्वासन आंदोलकांना दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेले शेतकरी सध्या रब्बी हंगामाच्या पिकांची तयारी करीत आहे.शेतात सध्या कांदा, गहू, आद्रक, हरबरा अशी पिके उभी आहेत. सध्या पिकांच्या भरणी हंगामाचा काळ असल्याने शेतकरी पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न करीत असताना वीज वितरण कंपनीने शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता काल सायंकाळी पाच वाजता वरखेड उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या चौदा गावाचा वीज पुरवठा खंडित केला.विशेष म्हणजे सिंगल फेज लाईट देखील बंद केल्याने वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्यांना रात्र जागून काढावी लागली. याबाबत वाल्मिक शिरसाठ यांनी काल रात्रीच तहीलदारांसह वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तात्काळ वीज पुरवठा सुरू करण्याची मागणी केली मात्र याबाबत प्रशासकीय पातळीवर कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने आज सर्व शेतकऱ्यांनी वरखेड उपकेंद्र गाठून येथे आंदोलन सुरू केले. यावेळी वीज



वितरण कंपनीचे उप कार्यकारी अभियंता गोविंद दुसिंगे, सहाय्यक अभियंता खंबाईतकर यांनी बंद केलेला वीज पुरवठा तात्काळ सुरू करण्याचे आश्वासन आंदोलकांना दिले. या आंदोलनात शिरसाठ यांच्यासह वरखेडचे सरपंच पंढरीनाथ जानराव, माजी सरपंच भारत वाघ, सुनील म्हस्के, साईराम राऊत, दिलीप वाघ, गणेश वाघ, अशोकराव दारुंटे, प्रकाश वाघ, योगेश म्हस्के, काकासाहेब पेहरकर, मनोज म्हस्के, प्रवीण बारहाते, मंगेश वाघ, शंकर वाघ, शुभम बारहाते, देवानंद मालकर, जावेद शहा आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन महाराष्ट्र वरिष्ठ उपाध्यक्षपदी शामका चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादांतांडा येथील शामका प्रदीप



चव्हाण यांची इंडीयन असोसिएशन महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सेराज अहमद कुरेशी यांच्या निर्देशानुसार तसेच मराठवाडा, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने मराठवाडा प्रदेश महासचिव व्यंकटेश सूर्यवंशी यांनी शामका चव्हाण यांची नियुक्ती केली आहे. नियुक्तीनंतर शामका चव्हाण यांनी सांगितले की पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन सदैव तत्पर आहे. शामका चव्हाण यांच्या नियुक्तीबद्दल मोहम्मद परवेज़, गिरिराज सिंह, सलमान अहमद, सनोबर अली कुरेशी एडवोकेट, रंजीत सम्राट, मो.एजाजुल हक, मो. सुल्तान अख्तर, नसीम रब्बानी, के.एम. राज, उपसंपादक गोकुलसिंग राजपूत (आनंद नगरी), सुनील चव्हाण,गणेश खैरे, जब्बार तडवी (एन.टी.व्ही. न्यूज मराठी), विजय मद्देशिया, जावेद पठाण (प्रदेश कोषाध्यक्ष मराठवाडा), शेख नबी सिपोराकर (मराठवाडा उपाध्यक्ष), देवेंद्र योगेन्द्र भोंडे (इम्पैक्ट 24 न्यूज), हाजी मोहम्मद तारिक शेख (जिल्हा अध्यक्ष नागपुर), फारूख शेख (जिल्हा अध्यक्ष, जळगांव), प्रा. लुकमान कुरेशी (जिल्हा अध्यक्ष, बुलढाणा), शकील अहमद (जिल्हा अध्यक्ष, परभणी), तौफिक कुरेशी (जिल्हा अध्यक्ष लातूर), बहादूर चव्हाण आदी पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले.



# विदेशातही माऊलींचा संजीवन समाधी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**बंडा महाराज लखमापुरकर**
**दिंडोरी :** जगाचे केंद्रबिंदु दुबई येथे कार्तिकी एकादशी निमित्त श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संजीवन सोहळा साजरा करण्यात आला त्यावेळी दुबईमध्ये कधीही न पडणारा पाऊस धो धो पडला नोव्हे हा सामान्य महिमा संतांचा ! पाऊस पडलेला पाहुण दुबईकरही आनंदात नाहुन निघाले...! जगाला विश्व शांतीचे प्रतिक ज्ञानोबाराय, जगाचे गुरु जगद्गुरु तुकोबाराय कळावे याकरिता श्रीसंत ज्ञानोबा-तुकोबा विश्व भ्रमण दिंडीच्या माध्यमातुन माऊलींचा संजीवन समाधी सोहळा दुबई श्रीराम मंदीर येथे संपन्न झाला. या दिंडीचे अध्यक्ष प्रीती करांडे संस्थापक दादासाहेब करांडे उपाध्यक्ष श्री.ह.भ.प.वारकरी समाज भुषण कृष्णानंदजी महाराज आवटे प्रमुख श्री. शेषजी महाराज कार्यध्यक्ष श्री.हनुमान घोंगडे श्री.आकाशजी डांगे या सर्वांच्या नियोजनाखाली हा सोहळा संपन्न झाला. श्रीक्षेत्र देहु येथे पादुका आल्यानंतर देहु संस्थानचे अध्यक्ष श्री.ह.भ.प. नितिन महाराज मोरे यांनी पादुकाचे पूजन करुन वारकऱ्यांचा सन्मान केला तसेच श्री क्षेत्र आळंदी येथे पादुका आल्यानंतर आळंदी संस्थान कमिटी ज्ञानेश्वरजी वीर यांच्या हस्ते पादुकाचे पुजन करुन वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच युवा उद्योजक सचिनशेठ यळवंडे यांच्या हस्ते पुजन व वारकऱ्यांचा मानसन्मान करण्यात आला. यावेळी अनिलजी जोगदंड, नाझिम सर, प्रतापजी चौधरी, एस. बी. ज्वलर्स बारामतीकर आण्णा, संतोष दरेकर, रामदास दरेकर,अमोल करांडे, कृपेन महाराज गुरव जालिंदर महाराज मोरे, शिवाजी पवार तसेच आळंदी व देहु ग्रामस्थ तसेच बाल वारकरी उपस्थित होते.



श्री विठ्ठल मंदिर येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठना स्थापना व कळशारोहन सोहळा सोमवार दि. 28 नोव्हेबर 2022 वेळ दु 2.00 वाजत मूर्ती प्राणप्रतिष्ठा वे.शा. सं. प. पू घोडजकर कळशारोहण, प.पू. श्री बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, दत संस्थान मठ पिंपळगाव यांच्या शुभ हस्ते संपन्न होईल. समस्त उमरी ग्रामस्थांनी या सोहळयास उपस्थित राहून शोभा वाढवावी सर्व वारकरी बांधवांकडून विनंती.




# भारती मोरे यांना सर्पमित्र जीवरक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सालाबादप्रमाणे यावर्षीही भारतीय संविधान गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र सेना संघटनेचा वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला. या निमित्ताने वन्यजीव रक्षक व सर्पमित्र भारती दत्तात्रय मोरे यांना अनमोल कार्य पाहून औरंगाबाद येथे सर्पमित्र जीव रक्षक पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यामुळे अनेक ठिकाणाहून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



# कलेचा स्पर्श माणसाला अहिंसक बनवतो

## ग्रंथोत्सवात चित्रकार श्रीधर अंभोरे यांची प्रकट मुलाखत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** आपल्या मुलांमधील उपजत कलेला प्रोत्साहन द्या. कोणत्याही कलेमध्ये आज मोठे करिअर करणे शक्य असून कलेचा स्पर्श माणसाला अहिंसक आणि जीवनाला सुंदर बनवतो, असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे चित्रकार श्रीधर अंभोरे यांनी केले. ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने ग्रंथोत्सव जालना 2022 या कार्यक्रमात श्रीधर अंभोरे यांची प्रकट मुलाखत प्रा. डॉ. सतीश बडवे, प्रा. रवींद्र सातपुते आणि विनोद जैतमहाल यांनी घेतली. या वेळी अंभोरे यांनी कला, साहित्य आणि वेदनेच्या सहसंबंधावर भाष्य केले. दि. 26 नोव्हेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाउन हॉल येथे ही मुलाखत संपन्न झाली. आपणास सृष्टी आणि माणसांविषयी अपार कुतूहल आहे. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या प्रदेशांशी आपला जवळून संबंध आला. आपले चित्रकलेविषयी औपचारिक शिक्षण झालेले नाही. कलेची आंतरिक प्रेरणा आणि सृष्टी पाहताना स्फुरलेले आकार चित्रबद्ध करतानाच मला माझ्यातला कलावंत सापडत गेला असे अंभोरे यांनी या वेळी सांगितले. श्रीधर अंभोरे यांचे वाचनही प्रचंड आहे आणि ते देश-विदेशात सतत पर्यटन करतात. खासकरून जंगलांमध्ये भटकंती करून निसर्गाचा प्राकृत स्पर्श अनुभवणे त्यांना आवडते. या दरम्यान आलेले अनेक थरारक अनुभवही त्यांनी या मुलाखतीत सांगितले. लहानपणी घरासमोरील बाभळीच्या जंगलामुळेच आपल्याला चित्रे काढण्याची प्रेरणा मिळाली, असेही त्यांनी सांगितले. आपल्या घरातील बालके भिंतीवर रेघोट्या मारून काही तरी रेखाटने करीत असतात, घरातील मंडळी त्यांच्यावर भिंत खराब होईल म्हणून ओरडतात. परंतु त्यामुळे मुलांची नैसर्गिक ऊर्मी दबते आणि पुढील आयुष्यात ही मुले हिंसक होण्याची शक्यता असते. मुळात प्रत्येकाला व्यक्त होण्यासाठी निसर्गाने उपजत कला दिली आहे. पालकांनी या संवेदना अकाली



मारून टाकू नये असा सल्लाही अंभोरे यांनी दिला. चित्रकाराच्या दृष्टीला वासनेचा स्पर्श नसावा. त्याची दृष्टी निरागस हवी. ती असेल तरच तो खरा चित्रकार असतो. प्रत्येक चांगल्या कलावंताने ही निरागस दृष्टी जपावी असे आवाहनही त्यांनी शेवटी केले. तब्बल दीड तासाच्या मुलाखतीमध्ये अंभोरे यांनी जीवनातील विविध मोठ्या माणसांसोबत पहिल्या भेटीतील गमती-जमती सांगितल्या. यात पु. लं. देशपांडे यांची पहिली भेट, सदाशिव अमरापूरकर यांचा सहवास व सहकार्य तर अभिनेता राज कपूर यांच्या पहिल्या भेटी वेळी झालेली त्रेधातिरपिट आणि त्यातून होता होता हुकलेली भेट आदी बहुसंख्य किस्से ऐकवले. डॉ. बडवे, सातपुते व जैतमहाल यांनी अंभोरे यांना मनसोक्त बोलते केले. आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी राजेश पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास शहरातील कवी, कलावंत, पत्रकार, चित्रकार आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोककलावंत पै. मजनूभाई शेख राज्यस्तरीय गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** येथील दोस्ती फाउंडेशनच्या वतीने ग्रामीण लोककलावंत पै. मजनूभाई शेख यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम दिनांक 4 डिसेंबर 2022 रोजी व्ही आय पी गेस्ट हाऊस, श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे आयोजित करण्यात येणार आहे. जुन्या पिढीतील लोककलावंत पै.मजनुभाई शेख हे नाट्यकलावंत, उत्कृष्ट हार्मोनियम वादक, गौळणरचिताकार तसेच उत्कृष्ट गायक होते. त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी दोस्ती फाउंडेशनतर्फे सदर पुरस्कार देऊन विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांस प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. यासाठी उत्कृष्ट प्रवासवर्णन, उत्कृष्ट गझलसंग्रह, उत्कृष्ट सुविचार संग्रह,उत्कृष्ट चारोळीसंग्रह, उत्कृष्ट लेखसंग्रह, उत्कृष्ट कादंबरी, उत्कृष्ट काव्यसंग्रह आणि उत्कृष्ट कथासंग्रह, सुविचार, आत्मकथन यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच कला, क्रीडा, साहित्य, वैद्यकीय, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्कृत पुस्तकास आणि व्यक्तीस आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. असे दोस्ती फाउंडेशनचे अध्यक्ष रज्जाकभाई शेख, नितीन गायके,नसीर सय्यद, देविदास बुधवंत, सत्तारभाई शेख, आनंदा साळवे, इमाम सय्यद, अमोलभाऊ शिंदे, मिराबक्ष बागवान, बाबासाहेब पवार, राजेंद्र देसाई आणि रजा इ इलाही ग्रुपच्या सदस्यांनी केले आहे. जीवनगौरव पुरस्कार श्रीमती लक्ष्मीबाई काशिनाथ सोनवणे, अहमदनगर पत्रकाररत्न दिगंबर भगरे, सोलापूर,भगवान राईतकर मेहकर बुलढाणा, चंद्रकांत वाकचौरे अहमदनगर, संजय व्यापारी औरंगाबाद, संदिप पाळंदे राहुरी,शौकतभाई शेख, श्रीरामपूर तर आत्मकथन - 'आयुष्य उसवताना'- भारत कवितके, समीक्षा ग्रंथ -'आंबेडकरी जाणींवांचा अक्षरप्रकाश' प्रशांत ढोले वर्धा, ग्रंथ- 'रंगनाथ तिवारी' डॉ. दिपक सूर्यवंशी, दिवाळी अंक- 'निशांत ' संपादक - निशांत दातीर संगमनेर, सुविचार संग्रह - 'विचारक्षण' गणेश कुंभारे, चंद्रपूर,कादंबरी -'आठवणी ' सायमन भारस्कर, नेवासा, लक्षवेधी कादंबरी - 'विस्कटलेली चौकट', मेघा








पाटील, बालसाहित्य लेखन पुरस्कार - 'मायबाप' अय्युब पठाण,पैठण, काव्यसंग्रह पुरस्कार -'जगणे इथेच संपत नाही' हणमंत पडवळ उस्मानाबाद, लक्षवेधी काव्यसंग्रह 'कल्पनेचा चांदवा'- कल्पना निंबोकार अंबुलकर औरंगाबाद, लक्षवेधी काव्यसंग्रह 'काव्यसार' श्रीमती संध्यारांनी कोल्हे उस्मानाबाद, कथासंग्रह पुरस्कार -'मातीचा देह' -डॉ. सुभाष कटकदौंड, कथासंग्रह पुरस्कार -'गोष्ट तिसऱ्या बायकोची' -भारत सातपुते, गझलसंग्रह पुरस्कार -'गझलछाया' -सिराज शिकलगार, सांगली, गझलसंग्रह पुरस्कार- 'हृदयातील सुगंधी जखमा' -यशवंत हिराबाई त्रिंबक पगारे, शिक्षकरत्न पुरस्कार अलकनंदा घुगे आंधळे औरंगाबाद, गौसपाशा शेख, पालघर, रेहाना मुजावर, श्रीरामपूर, सविता कदम, नांदेड, समाजरत्न- सुनीता वाळुंज सिन्नर, पंचवटी गोंडाळे नांदेड, शकील गवाणकर रत्नागिरी - श्वेता सावंत (सिंधुकन्या ) मालवण, ह.भ.प.चंद्रहास गवळी नेवासा,कलारत्न - वसुंधरा शर्मा सोलापूर, फारुख शेख, सिंदखेडराजा, दिलावर शेख, साकुर संगमनेर,वैद्यकरत्न -राजेंद्र फंड, तालुका आरोग्य सहाय्यक,राहाता, साहित्यरत्न - सारिका माकोडे भड, पुणे, मीना शेळके, संगमनेर, माधुरी फालक, उल्हासनगर, दुशांत निमकर, चंद्रपूर, आदर्श समाजसेवी संस्था, सद्गुरू संस्था, मंगळवेढा सोलापूर आणि बोधी ट्री फाउंडेशन औरंगाबाद यांना जाहीर झाला आहे. शासकीय विश्रामगृह श्रीरामपूरच्या सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा व नंतर पै मजनूभाई शेख यांना काव्यआदरांजली कार्यक्रम होणार आहे.

# पेट्रोलपंपावर पारदर्शक नळीचा वापर; आमदारांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्यात पेट्रोलचे भाव आधीच गगनाला भिडले



आहेत. त्यात काही पेट्रोल पंपावर इलेक्ट्रॉनिक सिस्टीमध्ये ट्रीक वापरून पेट्रोल कमी दिले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदारांनी याप्रकरणी पारदर्शकता यावी यासाठी पेट्रोलपंपावर पारदर्शक नळीचा वापर करावा अशी मागणी जिल्हा प्रशासनासह पुरवठा अधिकऱ्यांकडे. २३ मार्च रोजी केली होती. याची दखल घेत



धुळे जिल्ह्यातील पेट्रल पंपावर पारदर्शक नळ्या बसविण्यात याव्यात असे आदेश शासनस्तरावर पारित करण्यात आले. त्यानंतर जिल्हाभरातील पेट्रोल पंपावर पारदर्शक नळ्या बसविण्यात आल्या असल्याचे आमदार फारूक शाह यांनी कळविले आहे. तसेच नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत करीत आमदारांच्या कार्याचे कौतूक केले आहे.

# प्रा. भगवान सूर्यवंशी यांना पीएच.डी.

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,



औरंगाबादच्या जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभागातील संशोधक विद्यार्थी भगवान सूर्यवंशी यांना जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. प्रोफेसर तथा विभाग प्रमुख डॉ. दिनकर माने यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वृत्तपत्रातील वार्तांकन मराठवाड्याच्या संदर्भात विशेष अभ्यास या विषयावर शोध प्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल प्रा. सुरेश पुरी, माजी कुलगुरू प्रो. सुधीर गव्हाणे, प्रो. व्हि. एल. धारूरकर, माध्यम तज्ज्ञ प्रा. जयदेव डोळे सर, डॉ. नामदेव सानप, डॉ. संजीव सावळे , डॉ. गोविंद वाघमारे, डॉ. सुभाष सूर्यवंशी, प्रा. दर्शन रानवळकर, डॉ. अजय सूर्यवंशी आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)



नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# विविध सामाजिक उपक्रमांनी प्रीतमकुमार मुथा यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** येथील युवा उद्योजक प्रतिष्ठित व्यापारी वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक प्रितम मुथा यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्वात प्रथम गणपती मंदिरात महाआरतीने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर देवगाव रोड वरील गोशाळेत जनावरांसाठी एक गाडी हिरवा चारा भेट देण्यात आला, त्यानंतर लासुरगाव रोड वरील हरितक्रांती प्रतिष्ठान प्रकल्पात प्रितम मुथा



यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले, त्यानंतर ११ अपंग व्यक्तींना औषधे खरेदी करण्यासाठी मुथा यांच्याकडून आर्थिक मदत देण्यात आली. त्यानंतर गणेश भाऊ व्यवहारे मित्र मंडळातर्फे प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या प्रमाणात कपसिर व डोळ्याचे औषधीचे तुटवडा असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात ६०० कपसिरप तर ३०० डोळ्याचे ड्रॉप प्रितम मुथा यांच्या हस्ते वैद्यकीय अधिकारी डॉ.बापुसाहेब चाटे यांच्याकडे सोपविण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रितम भैय्या मुथा मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.